सह० ०    ॥
सालअखेर    ॥
किरकोळ अंकास ...०४

Six monthly..........3    8
Single copy.............................4

Advertisements.
Below 10 lines...2 Rs
Per line over 10...4as
Repetition perline3as


नोटीस रास्त आहे व तें
१० ओळी गैर तें कोणतें? न
पुढें दर पतेची खरी स्थिती
दुसरे दाद तरी लागावी
र त्यांस न कळलें
रा ह्या व इ
...या अत
वर्ष रग ये


# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL. I    AKOLA MONDAY 3 SEPTEMBER 1888    NO. 35

वर्ष १    अकोला सोमवार तारीख ३ माहे सप्टेंबर सन १८८८ इ०    अंक ३५



## K. B. RELE AND CO.'S MOST EFFICACIOUS.

## PREPARATIONS

## के. बी. रेळे कंपनीचीं अति स्वस्त व गुणकारी, रामबाण औषधें.

१ धातु पौष्टिक-शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत. अति श्रमानें व हरएक दु-स... ...ांनीं झालेली क्षीणता, मुखावरची ... पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्व... ...र्ण, हगवणीनें, खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थी-तीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ...च्या शेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर ...ज्वी येते. मज्जातंतूंस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते. काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वढते. प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात. परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध.

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध.

वरील औषधाबरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाव इ० माठविणारे मलम कायतें हेंच. किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा, डांग्या, घशांत गुदगुली होऊन येणारी इ० खोकले अचूक बरे होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिंवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते. अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार, संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागे हटले नाहीं किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकिटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांश:—

'के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व ( वगैरे ) * * * औषधीं ...ा लक्षपूर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
एम. ए. एम. डी."

सूचना— अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. एजंट्स पाहिजेत.

विशेष सूचना— आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारचीं दुसरीं इंग्रजी औषधें जर्मे, पेनीकलर, क्लोरोडाइन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाघ्याचीं तेलें, मलमें, साबू, पालिश, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज फ्रूट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे, वगैरे, व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागणाऱ्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं. नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

के. बी. रेळे कंपनी,
सेकंड कारपेंटर स्ट्रीट, खेतवाडी,
मुंबई.

☞ हीं औषधें सर्व इंग्रजी औषधें विकणारांकडे व मालकाकडे मिळतील.


## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

ता० २४—८—८८ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

कृतानेक सा० नमस्कार वि. वि. उमरखेड हा गांव पुसद तालुक्यांत आहे. अगदीं मोंगलाइच्या सरहद्दीवर आहे. येथील लोकांच्या रीतीभाती बहुधा मोंगलाईंतील लोकांच्या रीतीभाती प्रमाणेंच आहेत. येथें सरकारी कामगार हेडमास्तर, आनररी माजिस्त्रेट, चीफ कान्स्टेबल, पोष्ट मास्तर वगैरे आहेत, येथें व्यापार बराच आहे. येथें ब्राह्मणांची वस्ती बरीच आहे. सरकारचे बडे बडे कामगार इकडे फारसे येत नाहींत. कारण हें गांव अगदीं एका बाजूस आहे. येथें आई नाथाचे देवस्थान प्रसिद्ध आहे. यात्रेकरू लोक येतात. गांवांत साफसफाईचें काम बरेंच चालतें. आनररी माजिस्त्रेटाचें काम फारसे चालत नाहीं. त्याचें व त्यांचे कारकून यांचे असावे तसें रहस्य नाहीं. कारण हरी जाणे. गांवांत दुफळ्या आहेत कोणास कारकून अवडतात कोणाला माजास्त्रेट आवडतात. नवीन आलेले पोलीस कामगार फारच हुशार असून लोकप्रिय आहेत पोलीसचे कामांत फारच वाकबगार असून चलाख आहेत. येथें शाळा आहे ही मराठी आहे. येथें इंग्रजी शाळा असणें जरूर आहे. कारण येथून इंग्रजी शिकण्यास जाणें झटलें ह्मणजे फारच लांब जावें लागते. हल्लीं मराठी शाळा चांगली चालली आहे. मास्तर बरे आहेत. परंतु एकच मनुष्य फार दिवस राहिला ह्मणजे कित्येकांचे मर्जीतून उतरतो हा सृष्टी क्रमच आहे. यांत चांगले वाईट ह्मणण्या सारखें नाहीं. यांणी शाळेची चांगला सुधारणा केली दरवर्षीं निकाल ही चांगले होतात. हे गृहस्थ सज्जन आहेत. सर्व गोष्टी उत्तम प्रकारें चालल्या असतां मध्येंच आमचे येथील शाळेंत मोठें संकट आले होते. तें जर कांहीं दिवस तसेंच टिकते तर शाळा बिघडानी इतकेंच नाहीं तर याहून कोणता अधीक परीणाम झाला असतां हे ही सांगतां आले नसतें. तें संकट हें कीं कोणी येथें सहा रुपया वर अ. मास्तर आला होता. तो फक्त दोन अडीच महिनेच येथें असेल इतक्यांत त्याणे मोठा कहर करून दिला होता. दुर्गुणांचें केवळ घर. दुष्ट पापी. सर्व लोकांशी कलह. शाळेंत कोणी गेला तर त्याची अप्रतिष्ठा करावयाची त्यास लागलेली सवई. तरुण तरुण लोकांच्या स्नुषांवर, युवतींवर ज्याची नजर, अशा ह्या दुर्गुणामुळें विद्यार्थ्यास एक दोन वेळां मुष्टी मोदकाची पाळी हि आली होती. आंघोळ करण्यांत काय आहे. गंध लावण्यांत काय आहे. दारु पातळ तसेंच थाणी पातळ. मग पाण्या प्रमाणें ती पिण्यांत काय बाध आहे. हेड मास्तर यांस काय येते, आमक्यास काय येते, तमक्यास काय येते. मज सारखा जाडा विद्वान कोणी नाहीं. अशी ज्याची त्याची निर्भत्सना करावी. एकूण येथें सरकारी शाळा स्थापन झाल्यापासून अनेक प्रकारचे मास्तर होऊन गेले परंतु असा अद्वितीय पुतळा पहिल्यांदाच पहाण्यांत आला आहे. परंतु ईश्वरकृपेनें त्याचें येथून लवकरच उच्चाटण झालें. हो फारच बरी गोष्ट झाली याजवर लोकांचे त्यांजवर लोकांचे अर्ज झालें व हें प्रकर्ण मे. डा. साहेबकडे गेलें. तिकडून निकाल येण्या पूर्वीच सदरहु मूर्तीनें राजीनामा देऊन रस्ता सुधारला. हो आमचेवर इश्वरी कृपाच समजली पाहिजे. दिवसानु दिवस लोकांची नीती बिघडत चालली. यास उपाय इतकाच आहे कीं नीती बद्दल सरटोफिकीट असल्या शिवाय नोकरी देऊं नये, ह्मणजे झालें. अशानें कांहीं तरी बरा परीणाम होईल. अलीकडे मुलें उद्दाम होत चालली याचें कारण काय बरें असावें? विद्येनें मनुष्यां मध्यें लीनपणा येतो. सभ्यपणा उत्पन्न होतो. सदाचार कळतो असे अनेक फायदे असून शिवाय चरितार्थ चालतो. असें असतां अलीकडच्या शिक्षणा पासून असें फळ प्राप्त होतां भलभलते छंद, नाना प्रकारचे दुर्गुण मुलांत कां उत्पन्न होतात? हा विद्या देण्यात कमीपणा किंवा सध्या काळाचीच स्थिति अशी ह्मणून असें होतें. किंवा कसें याचें कारण कोणी शोधून काढील काय? अलीकडे मुलांनां असें कांहीं वाटतें कीं, सर्व कारभारी आह्मी. लहान नाहीं, मोठा नाहीं, आप नाहीं परवा नाहीं. सर्व टका शेर भाजा व टका शेर खाजा. पूर्वींचे लोक पहा. आपले गुरु, आपले मातापितर, इष्टमित्र, वरिष्ट यांची किती अदबी ठेवीत. सरकारांत किती जपून वागत. वरिष्टांची मर्जी आपल्या सदाचरणानें नेकीनें किती सुप्रसन्न करून घेत. नाहीं तर आतांचीं. अलीकडच्यानां कोणी वाईट ह्मटलें कीं, मोठें त्यांनां भूषण वाटतें. भीच ह्मणतो असे नाहीं. वरिष्ठ सरकारा पर्यंत ...िक्षा जाऊन शाळांतून नीती शिक्षण करावें. अशा विषयीं वाटावाट वर्तमानपत्रा द्वारें कानीं येतें. आतां शिक्षण नीती संबंधी कसें सुरू करावयाचें हें अजून समजलें नाहीं. वास्तविक पहातां शाळांतून जीं पुस्तकें ...लागत त्यांत नीती शिक्षण तर पुरें आहे परंतु अलीकडच्या शिक्षणाचा ठसा कां उमटत नाहीं कोण जाणें. कोणतीही गोष्ट जास्त झाली कीं त्याची माती होते त्याच प्रमाणें अलीकडे विद्या फार झाली त्या मुळें ...किंमत कळत नाहींशी झाली. असो. याग...ष्टींचा सरकारच विचार करीत आहे. ...या विषयीं येथें चर्चा करण्यांत हशील...हीं. हा विचार येथें सुचण्यास सदरहू

मास्तर कारण झालें. ते आणखी कांहीं दिवस येथें राहते तर मग काय सर्व भ्रष्टाचार होऊन गेला असता. मुलें या विद्वानांचा किता गिरवून असेंही ह्मणूं लागलीं असती कीं, हजामत केल्यावर स्नान कशा करितां पाहिजे. बाहेर दिशेस गेल्यावर पाणीच कां असावें. कागद उपयोगी पडत नाहींत काय! अ... हा गांव पूर्वी मोगलांचा परंतु मोगलांचा तो निझामाचा झाला. निझामानें नाना साहेब पेशव्यांचे वेळी चोळी परकरा करितां पेशव्यास दिला. त्यांजकडे वहीवाट असतां देखील रीतीभाती पुण्यपत्तनाप्रमाणें होत्या. अजून ही तिकडील लोक येथें येऊन पूर्वींपासून राहिलेले आहेत. अर्वात फार दिवसांच्या राहण्यामुळें इकडील रिवाजाप्रमाणें त्यांच्यांत फरक पडला यांत नवल तें काय! येथून आगगाडी फार लांब. तो आमचेवर कृपा करून आमचे सानिध्य कधीं आगमन कराल तो आह्माला सुदीन समजला पाहिजे. पत्रकर्तेराव माफी करील अपरिचिताचा धिःकार नकाहो करूं. कळावें. लोभ कीजे हे विनंती.

आपला फिरस्ता.
"क्ष"

---

मुंबई ता० २७-८-१८८८

रा. रा. 'वऱ्हाडसमाचार' कर्ते यांस

सा. न. वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस येत्या अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

अकोला व उमरावती हायस्कुलांतून 'मॅट्रिक्युलेशन' परिक्षा पास होणाऱ्या तीन विद्यार्थ्यांस दरसाल तीन 'स्कॉलरशिपस' मिळतात व त्या तीन वर्षें चालतात. परंतु स्कॉलर' युनिव्हर्सिटीचे परिक्षेंत नापास झाला असतां त्याची 'स्कालरशिप' जाईल असा सुमारें तीन वर्षांपूर्वीं ठराव झाला. ी बंद केलेली 'स्कॉलरशिप' दुसऱ्या कोणाला तरी देण्या संबंधानें मुळीच नियम के. नाहीं तसला एक नियम पूर्वींच्या नियमांत घालावा अशी माझी सुचना आहे. का ण ही बंद केलेली 'स्कॉलरशिप' कोणा. ा न दिली तर उंच प्रतीच्या शिक्षणास त्तेजन देण्याचा सरकारचा हेतु एकीकडेच हतो. अशी 'स्कॉलरशिप' मिळेल या शेनें ही पहिल्या वर्षी 'स्कॉलरशिप' मिळाल्या शिवायच कॉलेजांत जाण्यास दिवसें दिवस जास्त मंडळी तयार होईल असा रंग दिसतो. कारण पांच वर्षांपूर्वीं 'स्कालरशिप' ळविणार व 'स्कॉलरशिप' न मिळविणारे यांचें प्रमाण तिहींस एक धरलें तर हल्लीं च प्रमाण एकास दोन धरण्यास हरकत हीं.

असा नवीन नियम केल्यानें कॉलेजांत पहिल्या वर्षी शिकणारे तीन दुसऱ्या वर्षी शिकणारे तीन व तिसऱ्या वर्षी शिकणारे तीन स्कॉलर' व मेडिकल कालेजांत चवथ्या र्षी शिकणारा एखादा 'स्कॉलर' इतके व स्कॉलरशीप' मिळेल या आशेनें निदान हीं तरी विद्यार्थी युनिव्हर्सिटीतील शिक्षणा लाभ घेतील.

बंद झालेली 'स्कॉलरशिप' मिळण्यास येक वऱ्हाडी विद्यार्थी लायक समजला जा मात्र ज्या वर्षी त्याला स्कॉलरशीप मिळा याची त्या पूर्वींच्या नोव्हेंबर महिन्यांत झालेल्या युनिव्हर्सिटीच्या ... झालेला असावा, व ... परीक्षेंत तो पास ... Superannuated + नसावा ...

वरील सूचनांचा शाळाखात्या... कारी व उच्च प्रतीच्या शिक्षणाचे अभिनीट विचार करितील अशी आशा ... कैवारी

\+ जो युनिव्हर्सिटीच्या परीक्षांत ... दोन दां नापास झाला असेल त्याला का... 'Superannuated' ह्मणतात. त्याला कॉ... नांतील 'स्कॉलरशीप' मिळविण्याचा हक्क नसतो.

आपला
Undergraduated

---

## वऱ्हाडसमाचार.

मिती श्रावण वद्य १२ शके १८१०.

## हिंदुस्थानदेश इंग्रज लोकांच्या ताब्यात राहील काय?

सदरहु विषयावर मेरिडिथ टाऊनसेंट या नांवाचे गृहस्थांनीं एक लेख प्रसिद्ध केला आहे. त्यांचे असें ह्मणणें आहे कीं, हिंदुस्थान देश आज ह्मणा चार दिवसांनीं ह्मणा इंग्रज सरकारचे ताब्यांतून जाणार आहे. व इंग्रज लोकांचें राज्य कांहीं कालानें तरी नाहींसें होणार आहे. व ज्या ज्या प्रमाणानें हिंदुस्थानचे लोक हुषार होतील व आपले हक्क काय आहेत हे जाणतील त्या त्या प्रमाणानें इंग्रज लोकांचे राज्याचे बळकटीस कमीपणा येवून देशांतील लोकांचे वर्चस्व वाढणार आहे. विलायतेंतील पुष्कळ पत्रांतून या विषयासंबंधानें बरीच भवति नभवति झाली आहे. व पुष्कळ वर्तमानपत्रांचें मत आहे कीं साहेब मजकुरांचे ह्मणण्यात विशेष अर्थ नाहीं व इंग्रज सरकारचे राज्याचें अहित चिंतणारे लोकाचे विचार साहेब मजकरांनीं प्रदर्शित केले आहेत असें त्यांचें ह्मणणें आहे.

इंग्रज लोकांचें राज्य या देशांत येऊन आज बरीच वर्षें झालीं व तितक्या वेळांत त्यांचे राज्याचा पाया बळकट राज्य व्यवस्थेचा जम चोहोंकडे बसून गेला आहे. पूर्वीं या देशावर जे राजे झाले त्या सर्वांपेक्षां इंग्रज सरकारचें राज्यांत व्यवस्था चांगली आहे; निदान राज्यकर्त्यांचा उद्देश तरी तसा आहे असा सर्व लोकांचा ग्रह आहे. इंग्रज सरकारचें राज्य या देशांत आल्यावर खरोखर एकछत्री राज्य झालें. पूर्वीं ज्या प्रमाणें लहान लहान प्रदेशावर संस्थानिक व मांडलीक राजे होते तसेंच जरी हल्लीं आहेत तरी सार्वभौमत्व एका राजाचे ह्मणण्या जोगे नव्हतें. ज्याचा जोर होईल त्यास खंडणी द्यावी असा प्रकार होता तो प्रकार हल्लीं अगदीं नाहींसा झाला आहे. व या इंग्रज सरकारचे सार्वभौम राज्याचें ब्रीद हें आहे कीं, लोकांचे मतानें सुखा करितांच केवळ राज्य करावयाचे. पूर्वींचे राजे लोकमतास अनुसरत असत असें नाहीं. परंतु लोकांचे मतास जसा या राज्यांत मान आहे व मान देण्याचा सरकारचा हेतु आहे तसा पूर्वींचे राजे देत नसत. राजाचें मत ज्या प्रमाणें असेल त्या प्रमाणेंच एकंदर व्यवस्था होत होती. तसा प्रकार हल्लीं नसल्याचे इंग्रज ...कार आपण होऊन लोकांस समज देतात. या हेतूनें सरकारनें आज पर्यंत लोकांस शिक्षण देण्याचा एकसारखा क्रम चालविला आहे. व त्याच शिक्षणाचा आज परिणाम दिसून येत आहे टाउनसेंड साहेब ह्मणतात कीं, हल्लीं जी मद्रासेस कांग्रेस भरली होती त्यापासून इंग्रजसरकारचे राज्यास अपाय होईल असें दिसत आहे. परंतु ही त्यांची व या प्रमाणेंच इतर ह्मणणारे जे लोक आहेत त्यांची चुकीच आहे असें आह्मी कित्येक वेळां पूर्वीं लिहिलें आहे व अद्यापही आमचें तेंच म्हणणें कायम आहे. राष्ट्रीय सभा मद्रासेस भरली होती त्यांतील लोकांचा हेतु काय आहे हें त्यांनी जगजाहीर रीतीनें आपल्या रिपोर्टांत दाखविलें आहे व हा हेतु विलायत पर्यंत पोंचला आहे. असें असूनही कित्येक लोकांचे मनावर त्या सभेविषयीं चमत्कारीक ग्रह आहेत हें नवल आहे. यावरून एक गोष्ट शाबीत होते कीं, या सभेचे हेतु ज्या प्रमाणें कळावे त्याप्रमाणें अद्याप कळले नाहींत. त्या सभेचा हेतु इंग्रज सरकारचे राज्यास कोणत्याही रीतीनें अपाय आणण्याचा मुळींच नाहीं. केवळ आपलें दुःख काय आहे हें सरकारास कळवावें हाच आहे.

या सभेचे वास्तविक उद्देश जरी वारंवार तिनें प्रसिद्ध केले आहेत तत्रापि त्याविषयीं पुष्कळ इंग्रज अमलदारांचें मनांत संशय आहे. परंतु तसा संशय अगर भीती बाळगण्यास कांहीं कारण नाहीं जर इंग्रज सरकारची राज्य पद्धत न्यायाची व रास्त आहे असें लोकांच्या अनुभवास येत जाईल तर त्यांचें राज्य नाहींसें होण्याचें कांहींच कारण उरणार नाहीं. राज्यास अपाय होण्याची जी भीती आहे तिचीं कारणें पुष्कळ आहेत त्यांपैकीं हे एक सबळ कारण आहे. प्रजेचे जे वास्तविक हक्क आहेत ते न दिले व वेळोवेळ त्यांची ज्या प्रमाणें योग्यता असेल त्या प्रमाणें न वागविलें तर त्यापासून उत्पन्न होणारा असंतोष हें एक आहे. आतां हिंदुस्थानचें राज्य ज्या रीतीनें चालत आहे त्या रीतीनें चाललें असतां म्हणजे त्यांत जो कांहीं कमीपणा आहे तो नाहींसा न झाल्यास मात्र लोकांची राज्याविषयीं अप्रीति उत्पन्न होण्याचा संभव आहे. आज पर्यंत इंग्रज लोकां पैकीं ज्या लोकांनीं या देशावर राज्य केलें आहे व ज्यांस अधिकारा मुळें प्रजेचें खरें हित व राजाचें खरें हित काय काय आहे हें समजण्यास मार्ग उरला नाहीं त्या लोकांची अशी इच्छा आहे कीं, या देशांतील लोकांस मोठमोठीं अधिकाराचीं कामें मिळूं नयेत. व असें त्यांस वाटतें हें सहाजीकच आहे; कारण तसें झाल्यानें त्यांची सत्ता कमी होणार आहे, व त्यांचा अधिकार ज्या तऱ्हेनें स्वतंत्रपणानें हल्लीं चालतो तसा चालणार नाहीं. अशा लोकांच्या दुर्दैवानें विलायतेंतील राज्य... हिंदुस्थानांत बंडे ... तर मात्र ... संतोष उत्पन्न होण्य... ...शय अ- जोंपर्यंत इंग्लंड देशांतील ... परंतु ... क केवळ आपलपोटे बनून ... लो- देणार नाहींत तोंपर्यंत या ... मोडण्या सारखे कांहीं होईल ... बिलकूल कारण नाहीं. ... यास

१८८८ ई० ... the ... both in ur... ability of lo... developed and ... the Government ... contributions, and ... provision mad... gets, when ... XI ... regard t... rnment ... २ ... nce, as ... efe... ing

इंग्रज लोकांनीं आमचे दे... जें शिक्षण दिलें आहे तेंच रि... लोकांस ... रकारचें राज्यास अपाय आण... इंग्रज स- काय? हा मोठाच प्रश्न वरील साहे... आहे कीं रांनीं काढला आहे. हल्लीं तर य... ब मजकु- सुशिक्षित ह्मणविणारे लोक ... देशांत जे पक्की खातरी आहे कीं, इंग्रज ...हेत त्यांची ज्य या देशावर असलेंच प... हिजे व ते असल्या पासूनच या देशाचें खरें हीत आहे. या देशाची सुधारणा हो... यास इंग्रज सरकार सारखे जबरदस्त राज्य या देशावर पाहिजे आहे असें त्यांस वाटत आहे इतकेंच नव्हे परंतु हरएक प्रसंगीं ते त्या प्रमाणें बोलून दाखवितात. इंग्रज सरकारचे राज्यापासून जे सहस्रशः फायदे झाले आहेत ते वास्तविकपणें जसे सुशिक्षित लोकांस कळतात त्या प्रमाणें इतर लोकांस कळत ही नाहींत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असें असतांना परशत्रु आला असतां अगर देशांतले देशांत ही ते लोक दंगे करतील किंवा इंग्रज सरकारचे राज्यास धोका आणण्या जोगें कोणते ही कृत्य करण्यास धजतील असें समजण्यास कांहीं कारण नाहीं. उलट हरएक प्रसंगीं इंग्रजी राज्याची जेणें करून बळकटी राहील अशीं कृत्यें करण्यास ते उमेदवार आहेत. ह्मणजे 'व्हालिंटीअर' बनण्यास व इंग्रज सरकारचे तर्फेनें लढण्यास देखील ते तयार आहेत इतकी त्यांची तयारी असतांना त्याज विषयीं संशय मनांत आणणें हे किती कमसमजुतीचें काम आहे परंतु या विषयीं इंग्लंड देशांतील लोकांस केवळ दूषण देतां येत नाहीं. त्यास खरोखर आह्मी कसे आहों, आमचे सुशिक्षित लोक कसे आहेत त्यांचे आचारविचार कसे आहेत. वगैरे सर्व गोष्टींची फारच कमी माहिती आहे व त्या मुळेंच लोकांनां त्यांचे मनांत ज्या खऱ्या खोट्या गोष्टी भरवाव्या त्या त्यांस खऱ्या वाटतात. हा दोष अंशतः आमचाही आहे; कारण आपली खरी स्थिती विषयीं त्यांस माहिती करून देणें हें आपलें काम आहे.

आतां ज्या प्रमाणें इंग्रज सरकारचे राज्या पासून अनेक फायदे आहेत त्या प्रमाणेंच त्यांत कित्येक गोष्टी कमीपणा आणणाऱ्या आहेत. त्या पैकीं बऱ्याच गोष्टी राष्ट्रीय सभेनें सरकारचे नजरेस आणल्याच आहेत. व आणखीही पुनः आणतील. देशांतून सालोसाल इंग्रजी अंमलदाराचा पगार ह्मणून कोट्यावधि रुपये या देशांतून प्रत्येक वर्षी विलायतेंत जातात व त्या मुळेंच या देशांतील लोकांचे शरीरावर कर्जाचा बोजा दिवसेंदिवस जास्ती बसत आहे ही गोष्ट सरकारचे नजरेस आणली गेली आहे. तसेंच लष्करी खात्यांतील खर्च सरकारनें कमी करावा. अशीही पण त्यास सुचना झाली आहे व तो खर्च कोणत्या तऱ्हेनें कमी करावेत हें ही सुचविलें आहे. अशा अनेक गोष्टींचे संबंधानें जें लोकांचें दुःख आहे तें सरकारास

म ह्मणून कम्पटोलरचे कचेरींत त्या महिन्याचे १० तारखे पर्यंत पाठवावी.

[ पुढें चालूं ]

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 10, 1888.

## THE MUNICIPALITIES AND THE NEW SCHEME.

Now that the Local Self-Government Scheme is promised shortly to be introduced into the larger Municipal towns of this province we think that it is time that we should touch upon the subject of the working of the Municipalities. Heretofore we had some, though not many, reasons for being silent on some points regarding the management which was in toto and for all practical purposes, although it had the sham appearance of a representative system, in the hands of the individual government officer put at the head of it. We need not say much in exemplifying this opinion beyond putting up the fact that all the members of Municipalities were nominated by the Government and not by the public whose interests they are supposed to protect and promote. But the introduction of the new scheme quite changes the situation. Under the scheme the Majority of the members will be electable by the people a minority being nominated by Government. The natural effect of this would be that the interests of the public will as surely be protected if but the forward individuals who are fitted for the task which would devolve on them do it concienciously and for this end alone we take upon ourselves to draw the attention of these individuals to the pitfalls which some of them allowed themselves with open eyes to fall in. Partiality self interest and such other things are the bane of people and they should always be driven away. Where these exist public work can never be done with popularity and of course even to their own satisfaction we have seen more instances than one happen in our local town and in others which are not a grace to the institution. Take for instance, the recently decided case of Panhalker *Versus* Municipality in which the former had sued the latter for recovering possession of a small but beautiful garden planted by him on a site on the bank of the river Morna which was leased to him for a number of years and of the possession of which he was as he says, deprived wrongfully. As the case has not been decided contestedly we are not prepared to say for certain which party is to blame in the matter but the idea naturally forces itself upon us that the Municipality had done something which was wrong. That because they compromised the case by restoring possession and in addition agreeing to pay the mesne profits. There is another case also of a civil nature pending against the Municipality and it being subjudice we cannot pass any structures on the action of the Municipality or the plaintiff; but according to popular way of thinking the very fact of the Municipality being sued by different individuals and the suppressed out-cry of the people of the town against some of the actions of the Municipality are sufficient to make the institution unpopular.

We hope that the few words which we have said, will open their eyes to the approaching contingency in which if they but fail there is fear of injury being done to poor India, and venture to promise that although the above will not be suited to the relish of the parties concerned it will, if accepted bear the fruits of a sour medicine.

## RESOLUTION.

(Continued from our last issue.)

Under the system indicated above, it will, it is hoped, be possible to meet from Local resources the money necessary for Local sanitary improvements. There may, however, be very exceptional cases the requirements of which cannot be met from Local & Provincial resources or by loans. In such rare cases the Government of India will not refuse to consider applications from Local Governments in the interests of sanitary improvements of more than local importance.

Order.—Ordered, that a copy of the above Resolution be forwarded to Local Governments and Administrations for information and guidence; that a copy be forwarded to the Department of Finance and Commerce and to the Public Works Department, for information; and that a copy be forwarded to the Sanitary Commissioner with the Government of India, for information.

Also that the Resolution be published in the *Gazette of India.*

1

*Practical Hints for the Sānitary Improvement of the smaller Municipal Towns in India.*

1. In the larger cities and towns in India, employing their own Engineers and Officers of Health, the foundation of sanitary improvement must be laid in works of domestic sewerage and drainage, in water supply brought from a distance, in surface levelling, paving, and cleansing, and in surface drainage. These, together with opening up new thoroughfares, tree planting, and improved house construction, where sufficient funds are available, will improve the general health, and mitigate or prevent outbreaks of epidemic disease in all the large groups of population. They are not only the most effectual measures which can be adopted for these objects, but for large dense populations they are in the end the cheapest.

In the smaller municipalities the chief difficulty that lies in the way of adopting them is, that where there are a few thousand people, most of whom are of the poorer classes, funds are limited, and there is no local source from which the capital sums required for the execution of permanent works can be drawn, at least at present. Although public health measures to be executed mainly by hand labour may be more costly than the current outlay for permanent works, still much may be done among small populations by the proper application of limited income; and the object of the present paper is to point out, as far as it may be practicable to do so, the chief directions in which limited local expenditure may be applied to effect this object. But the nature and extent of legislative and administrative measures and authorities required to give practical effect to the principles embodied in the following paragraphs, whether for small municipal towns or villages, must be left solely to the authorities in India.

2. In all municipalities the two primary means of preventing outbursts of disease are strict attention to domestic cleanliness, and the protection of water sources.

There is every reason for suspecting that the chief disease causes in all Indian towns are to be found within the walls which enclose the compounds and houses.

Here are sketches of two classes of houses, taken from a Bengal report. The first of well-to-do people; the second is a middle class house.

These houses, from being enclosed within walls, have no proper ventilation, and the rooms are so dark as sometimes to require a lamp day and night.

In some parts of India it is the practice to cover in the entire courtyard, so that foul exhalations are prevented from escaping into the air. In such cases ventilation of the court as well as of the houses is required. The huts of the poor have generally no enclosure walls, and have one door to the hut; they have hence more light and air.

3. The privies in all these houses are described as being "made of wells in which the dirt accumulates for years."

The plans show that the water wells are dug in the same soil close to the privies, and this rough sketch shows the dangers to health arising from such an arrangement:

There cannot be a doubt that the well water under such circumstances is liable to constant pollution by infiltration of liquid filth from the privy, and also by foul surface washings from the yard, which is often in an exceedingly filthy state from the urine and dung of animals as well as of human beings.

Where houses have been long inhabited, the whole ground within the court walls under the sleeping rooms, from which the well draws most of its water, is fouled, and the inhabitants are exposed to all the consequences of living on foul ground, breathing impure air, especially at night, and drinking unwholesome water.

The simplest way of avoding these dangers would be by rebuilding the houses on new ground, and adopting precautions to prevent the subsoil being polluted with filth. But as this cannot be done, the next best thing is to remedy the present evils as far as it may be practicable to do so.

4 The first step is obviously to prevent further pollution of the ground by cleansing and filling up all cesspits and filth wells. In many instances it would be advantageous to dig up and remove the surface earth of the compounds, and to replace it with fresh clean earth. Wherever means are available, the surface of the court or compound should be covered with paving, or some other hard impermeable material, such as rammed kunkur, and drained by channels to the streets outside.

Where a durable material for surface paving cannot be obtained, the most efficient substitute would probably be found in fresh clay hard rammed, so as to form a hard impervious surface, to be renewed by clean material at short intervals.

(To be continued.)

## वऱ्हाड

हवामानः—येत्या आठवड्यांत शेवटीं शेवटीं पर्जन्य थोडासा पडला, जास्त येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. लोकांना थोडीशी उमेद आली.

अकोला हिंगोली रेलवेचें काम यवतमाळ येथील कंट्रक्टर मि. ओबर्ट यास देण्या संबंधानें पत्रव्यवहार चालूं आहे असें कळतें.

गेल्या मंगळवारीं म्युनिसिपालीटीच्या नवीन बांधलेल्या ग्रेन मार्केटच्या इमारतीचा प्रवेश समारंभ झाला. बरीच व्यापारी वगैरे मंडळी जमली होती. अध्यक्ष स्थानीं रा. सा. देवराव विनायक व्हैस प्रेसिडेन्ट हे होतें.

रा० गोविंदराव आपा यांस नेमल्या प्रमाणें त्यांनी गेले आठवड्यांत येथें येऊन एकस्ट्रा अ० कमिशनरचे जागेचा च्यार्ज घतला.

मि. शापुरजी वीरजी यांस थर्ड क्लास तहशिलदार केलें व रा. रा. बळवंत बापुजी यांस कायमचे फोर्थ ग्रेड तहशिलदार नेमलें.

गेल्या गुरुवार पासून उमरावतीस वकिलीचे परीक्षेस आरंभ झाला परीक्षेस १६ उमेदवार आहेत. कर्नल बुलक साहेब जु० क०, मि० डेव्हीस साहेब स्पे. ज. व मि० निजामुद्दीन साहेब स्पे. ज. हे परीक्षक आहेत.

मि गोविंदराज अप्पा तहशिलदार यांस आफिसिएटींग ए० अ० क० कमिशनर नेमल्यामुळें त्यांचें जागीं यवतमाळास रा० रा० बाळकृष्ण बळवंत सुळे बि.ए. क्लार्क आफ स्मा० का० कोर्ट उमरावती यांची नेमणूक झाली.

उमरावती व अकोलें हायस्कुलांतून म्याट्रिक्युलेशनचे परीक्षेस जाणारे विद्यार्थ्यांच्या प्रिलिमिनरी परीक्षेस आज आरंभ होणार आहे.

रा० रा० बळवंत बापुजी यांचे तहशिदारीचे जाग्यावर कायमची नेमणूक झाली.

### मागाहून आलेली नोटीस.

रा० सूर्यभान पाटील राहाणार वस्ती नागज तालुके बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, नरोबा वल्द नारायण देशमुख रहाणार निंबे तालुके बाळापूर. नोटीसीनें कळवितों कीं, कवशी मर्द निंबाजी राहाणार नागज इजपासून तुह्मी रुपये १०० देऊन तिचें घर तुह्मी गाहाण करून घेतलें. तेंच घर सदरहु कवशी मर्द निंबाजी इचे पासून आह्मी रुपये २०० शेस तुह्मा पूर्वी गहाण करून घेतले होते. व अलिकडे तिजला आह्मी रुपये आणखी १०० देऊन सदरहू घर खरीदी करून घेतलें व त्या प्रमाणें आमचे ताबे त ही आहे. आतां तुमच्या १०० शंभर रुपया बदल आज सुमारें पांच माहेने आम्ही तुम्हास रुपये घेऊन जाण्यास सांगीत आहों. परंतु तुम्हो तसें कांहीं एक आज पावेतों केलें नाहीं. याज करितां नोटीशीनें जाहीर केलें जातें कीं, तुम्ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांत सदरहु रुपये १०० घेऊन जावें. आणि पावती द्यावी. असें न केल्यास तुह्मी पुढें मागें रुपया बद्दल आम्हास विचारले असतां कोणच्या ही प्रकारनें जबाबदार आह्मी नाहीं. ह्मणून दिली नोटीस कळावें तारीख ८ माहे सपटंबर सन १८८८ इ०

(सही) नरोबा वल्द नारायणजी देशमुख राहाणार निंबे दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

कांहीं गोरी व्यापारी मंडळी हिंदुस्थान देशांत एकंदर १६ गिरण्या स्थापन करणार आहेत व त्या बद्दलचीं यंत्र सामुग्री त्यांनीं विलायतेहून मागविली आहे.

सरदार दिलजंग बहादुर यांनीं २१ लक्ष रु. निजामाच्या रेलवेचे शेर आपल्या नांवावर होतें ते निजामसरकारच्या नांवावर मुंबई येथें मि. कालेबोवी यांच्या कोर्टांत करून दिले असें समजतें.

दिवाण परुमल खुपचंद, जकोबबादचे डेप्युटी कलेक्टर, यांनीं आपिलांत सेशन जज्ज मि. ठाकूर यांनीं सोडून दिलें.

सर सालरजंग, सर जानगार्स्ट व मि० यामपामर यांच्या मधील हैदराबादसंबंधीं पत्रव्यवहार टुथमध्यें छापला आहे त्यामुळें तिकडे याजबद्दल बरीच चर्चा चालली आहे.

मि. डुरांड आक्टोबरच्या १ ल्या तारखेस काबूलकडे चालते होणार असें समजतें.

पनामा कनाल १८९० ते चालू होईल असें ह्मणतात.

जर्मनी, आस्ट्रीया व इटाली यांनीं लढाईच्या प्रसंगीं एकमेकांस मदत करावी. असें सिगनर किस्पीच्या भेटींत ठरविण्यांत आलें असें समजतें.

हिंदुस्थान सरकारचें आफिस सिमल्यास ता. ३ नवेंमबर रोजी बंद होईल व कलकत्यास ता० १९ सोमवार रोजीं उघडेल.

येत्या नवेंमबरमध्यें लार्ड डफरिन पतियालास जाणार आहेत त्यावेळेस पंजाबांतील संस्थानिकांनीं मदत देण्याचें अभिवचन दिलें आहे त्याचा निकाल होईल.

ओरिसा व कटक या प्रांतांत दुष्काळ पडण्याची चिन्हें दिसताहेत या बद्दल वेळेवर सरकारास सूचना होत आहेत तर त्याप्रमाणें सरकार मदत करण्यास तयार होईल असें दिसतें.

बडोद्याचे गाईकवाड आपल्या राजधानींत विजेचे दिवे लावणार असें ह्मणतात.

मध्यप्रांत मुंबई इलाख्याला जोडण्याबद्दलचा तेथील कमिशनरचा रिपोर्ट मुंबई सरकाराकडे पाठविण्यांत येईल व लार्ड लन्सडौन आले ह्मणजे सिंधचा निकाल होईल असें ह्मणतात.

माटेनिग्रो येथें दुष्काळ फार पडला आहे व झार साहेबांनीं १२००० रु० बक्स व धान्याचें एक तारु पाठविलें परतु तें फक्त आठवडाभर त्यांनां पुरलें.

आकाशांत ६००० तारे दुर्बिणीशिवाय दिसतात व उत्तम दुर्बिणीनें ६,००,०००० दिसतात असें समजतें.

मुनशी अबदुल करिम यांनां राणीसाहेबांनीं १४४० रु. देऊन हिंदुस्थानी शिकविण्यासाठीं मास्तर ठेविले आहे असें ह्मणतात.

निजामसरकारानें सिमल्यास बरीच जागा खरेदी घेतली आहे व तेथें एक सुंदर राजवाडा बांधण्याचा त्यांचा विचार आहे.

सु० प०

सिविल व मिलीटरी ग्याझिट पत्रकर्ते असें सुचवितात कीं, आमचे सरकार कित्येक एतद्देशीय राजांस असा अधिकार देणार आहे कीं, त ते सस्थानिक आपापल्या मुलखांत देशी लोकांच्या आधीन थोडथोडी सेना ठेवण्याचा हुकूम देणार आहे. हे ऐकुन आह्मांस बराच आनंद होतो. ईश्वर करो, व हा ठराव अमलांत येवो.

मोठ्याचें सर्वच मोठें. मुंबईतील एका यूरोपियन साहेबानें जि. आय. पी. रेल्वेवर सव्वा लक्ष रुपयांची फिर्याद मांडली आहे. कारण असें आहे कीं, साहेब गाडींत बसून फेरफटका करीत असतां साहेबांच्या गाडीचा घोडा बुजून रेल्वेच्या जागेंत गेला, व तेथें गाडी पडली. तेणें करून साहेबाचा हात मोडला! ही जागा नीटनेटकी केली नव्हती ह्मणून हा अनर्थ झाला. रेल्वे १० हजार रुपये देत आहे. परंतु साहेब ऐकत नाहीं.

चौपदी कुक्कुट एका कोंबडी पाळ्याचे कोंबडीस कांहीं पिलें झालीं, एकास चार पाय आहेत व अजून जिवंत आहे. काय चमत्कार हा!

दार्जिलिंग येथें एक मुलाचे व एक मुलींचें असें दान कालेजें स्थापन व्हावयाचीं आहेत.

नबीन येणारे गव्हरनर जनरल येत्या डिसेंबर महिन्यांत येतील व ते मुंबईस फक्त एक दिवसच रहातील. ते० मि०

अंदमान आणि निकोबार बेटांत लष्करी पोलिस ठेवण्याबद्दल एक ठराव सरकारानें केला आहे.

गोन्पास शिक्षा— घराची आगळीक, चोरी, चोरीचा माल घेणें, आणि दबून रहाणें इत्यादि गुन्ह्याबद्दल जॉनपीयर्सहिला ऊर्फ जे. मर्टन यांस कलकत्ता हायकोर्टाच्या सेशनांत ३ वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली.

घोड्यांची उपज करण्याचें खातें लष्करी खात्या कडून काढून शेतकी खात्यास सामील केलें. श० सू०

बंगाल्यांत दुष्काळाचीं कामें सुरू झालीं आहेत.

गेले चार महिन्यांत मिठाचे जकाती पासून सरकारास ४०९०००० रुपये उत्पन्न झालें.

निजाम सरकार एक तरुण हिंदुस्थानीस १५००० रुपये खर्च करून विलायतेस वैद्यकीय ज्ञान संपादण्या करितां पाठविणार आहेत.

पुष्कळ जर्मन अंमलदारांचा असा समज झाला आहे कीं, इंग्लंडमध्यें अगदीं पाणी राहिलें नाहीं.

पत्र संख्या सर्व जगांत दर वर्षीं पांच शंकू पत्रें टपाल्यांत पडतात. न्या. सिं.

सोलापूर पाऊस नाहीं. वारा एकसारखा फोफावत असून उन्हाळ्या प्रमाणें उष्मा होतो. खरीपाची पिकें तर गेलींच व पुढचें चिन्हही नीट दिसत नाहीं. यामुळें लोकांचा धीर खचत चालला आहे. इश्वराचे मनांतून काय आहे कळत नाहीं.

सुरत येथील हुन्नर शाळेचे सुपरिंटेंडंट यांस पैशाची अफरातफर केल्याबद्दल ६ वर्षें सक्त मंजुरी व ६०० रुपये दंड झाला.

कूपर्स हिल यथील इंजिनियर कालेजांत यंदांचे परीक्षेंत बाबू प्रियनाथ सेन नांवाचे नेटिव गृहस्थ पास झाले. नंबर पहिला आला.

आलाहाबाद येथील नवीन युनिव्हरसिटीनें म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेपर्यंत देशभाषा शिकल्याच पाहिजेत असा नियम केला. क० त०

पेनशन घेण्याची वयाची मुदत ६० वर्षांची असावी असें स्टेट सेक्रेटरीनें ठरविलें आहे.

जलप्रलय बुंदेल खंडांत अतिशय पर्जन्य वृष्टि झाली. असा पर्जन्य गेल्या वीस वर्षांत पडला नाहीं. असें ह्मणतात. काशीकडे ही पर्जन्य फार पडत आहे. बुंदेलखंडापैकीं प्रत्येक गांवांतील निदान शेंपन्नास तरी घरें वाहून गेली आहेत. पर्जन्यानें जमीन इतकी सैल झाली कीं त्याच्या योगानें गाई, बैल व मनुष्यें ही कित्येक ठिकाणीं जमीनींत रुतली गेली तीं वर आलींच नाहींत. एके ठिकाणीं तर हत्ती ही रुतला गेला त्याचा पत्ता नाहीं. लोक हवालदील झाले आहेत. छत्रपूर येथें ७०० घरें पडलीं असें आमचा तिकडील बातमीदार ह्मणतो.

न्या० सु०

अमेरिकेंतल्या कारखान्यांत आगगाडीचें इंजन मुळा पासून सर्व चौवीस तासांत तयार होऊन चालूं लागतें! नुकतेंच एका कारखान्यांत ११०००० पौंड वजनाचें इंजन तर फक्त १६ तास आणि ५५ मिनिटांतच तयार झाले! क.

---


निःसंशय कायदेशीर.

## न भूतो न भविष्यति!

## फारच दुर्मिळ संधि!!!

## बृहद्राष्ट्रीय शाब्दविजिगीषा.

( शब्दांवर बक्षिसें मिळविण्याची चढाओढ. )

मराठींत, इंग्रजींत, गुजराथींत आणि हिंदींत.

## बक्षिसांत

## रुपये २५००० चा विनियोग !!!

यांत

नशीबाची परीक्षा नसून अकलेचीच परीक्षा आहे.

## सिद्धेन्दुचन्द्रिका

नामक अपुर्व ग्रंथ जो मराठींत , गुजराथींत आणि हिंदी भाषेंत प्रसिद्ध करण्य चें योजिलें आहे, त्याचे वर्गणदारांस मात्र या चढाओढींत प्रवेश करितां येईल.

प्रत्येक प्रतीस किंमत.

## दोन रुपये.

वर्गणी भरल्या बरोबर बक्षिस चिठ्ठी मिळेल. तिच्या आधारें ज्या त्या भाषेंत विजिगीषा (जिंकण्याची स्पर्धा) करण्यास सांपडेल

## विशेष योजना.

जे गृहस्थ निरनिराळ्या तिन्ही भाषेंतील तीन पुस्तकांस एकदम वर्गणीदार होतील त्यांसच इंग्रजी भाषेंत शब्द तयार करून विजिगीषा करण्याचा हक्क मिळून शिवाय त्या तिन्ही भाषांत ही विजिगीषा करितां येईल.

या तीन प्रतींचीं किंमत.

## फक्त पांच रुपये.

ठेविली आहे.

सर्व खुलासेवार माहिती साठीं प्रास्पेक्टस मागावा.

**मेसर्स. जे. भाटिया ऍन्ड ब्रदर्स.**

नं० ३८८, फाकलंड रोड, भायखळा.

---

## अवश्यपहा.

## गजकर्णावर रामबाण औषध.

वऱ्हाड व नागपूर या दोन प्रांतांत हजारों लोकांस गुण येत आहे. गुणा बद्दल खात्री इतकीच कीं, गुण न आल्यास किंमत परत देऊं. गुणाबद्दल पुष्कळ सर्टिफिकिटें आहेत, त्यांपैकीं कांहीं बाटली बरोबर असलेल्या माहितीच्या कागदांत दिलीं आहेत. दर बाटलीची किंमत ०९ आणे.

## खरजेवर मलम.

गुलाबी मुळींच झोंबत नाहीं. पांच चार दिवस लावल्यानें खरूज, फोड, आगपेण हीं खात्रीनें बरीं होतात. किंमत दर डबीस ०८ आणे.

## हीव तापावर गोळ्या.

कितीही दिवसांनी येणारें हीव असो सुमारें १० अगर १२ गोळ्यांनीं बंद होतें. दर बाटलीची किंमत १२ आणे.

सूचनाः—ही सर्व औषधें अनुभवलेली आहेत सबब रोग्यांस अशी विनंती आहे कीं गरज पडेल तेव्हां या औषधांचा अवश्य उपयोग करून पहावा. प्रत्येक औषधास बंगी खर्च ०१ आणा. बंगी नाटपेड माहितीचा कागद बरोबर. हीं सर्व औषधें वऱ्हाडांत अकोलें येथें आमचे दवाखान्यांत रोख पैशानें अगर व्हा. पे. नें मिळतील.

कळावें.नारायण चिंतामण डाक्तर.


---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालभरचें ७ " १८८
किरकोळ अंकास.......................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.... ...०१

Six monthly............3 " 8 as
Single copy....................................4 a

Advertisements.
Below 10 lines...2Rs.
Per line over 10..4as.
Repetition perline3as.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

AOLXXII AKOLA MONDAY 17 SEPTEMBER 1888 NO. 37

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख १७ माहे सप्टेंबर सन १८८८ इ० अंक ३७

K. B. RELE AND CO.'S MOST EFFICACIOUS.

PREPARATIONS

केबी. रेळे कंपनीचीं अति स्वस्त व गुणकारी, रा म बा ण औ ष धें.

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत. अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें, खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्त्रीतीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते. मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते. काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते पाचनशक्ति वाढते. प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात. परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध.

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध.

वरील औषधाबरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाव इ० माठविणारें मलम कायतें हेंच. किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा, डांग्या, बशांत गुदगुली होऊन येणारा इ० खोकले अचुक बरे होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिंवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते. अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार, संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागे हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकिटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

" के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व ( वगैरे ) * * * औषधीं मी लक्षपूर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर त्रि. वि. गोखले,
एम. ए. एम. डी."

सूचना— अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. एजंट्स पाहिजेत.

विशेष सूचना— आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारचीं दुसरीं इंग्रजी औषधें जसें, पेनीकलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें, मलमें, साबु, पोट्याश, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे, वगैरे, व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागणाऱ्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं. नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

के. बी. रेळे कंपनी,
सेकंड कारपेंटर स्ट्रीट, खेतवाडी,
मुंबई.

☞ हीं औषधें सर्व इंग्रजी औषधें विकणारांकडे व मालकाकडे मिळतील.

वऱ्हाडसमाचार.

मिती भाद्रपद शुद्ध १२ शके १८१०.

## बरार रुरल बोरडस लॉ सन १८८५ यांतील कलम ३३ अन्वयें नियम.

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

९६. कमिशनर यांजकडे हिशोब पाठविण्या पूर्वीं दिपुटी कमिशनर यांणीं. ट्रेझरी आफिसरास शिलकी पत्रकावर असा दाखला देण्यास लावावें कीं त्यांत दाखविल्या प्रमाणें खजिन्यांत भरणा केलेली व खजिन्यांतून आदा केलेली रकम खजिन्याचे हिशोबाशीं मिळते.

९७. सर्व कोंटिनंट बिलें पाहिल्यावर व तपासल्यावर कमिशनर याणीं त्या महिन्याचे ३० वे तारखेस किंवा त्या सुमारास हिशोब कम्पट्रोलर यांजकडे पाठवावा. सादील खर्चाची सर्व सब-व्होचरें त्यांणीं आपले कचेरींत ठेऊन घ्यावीं.

९८. कायद्याचें कलम २४ यांत सांगितलेला वार्षिक हिशोब दिपुटी कमिशनरचे कचेरींत नमुना नंबर ११ प्रमाणें तयार करावा व दर वर्षी मे महिन्यांतील पहिले आठवड्या पर्यंत तो बोरडाचे सभेकडे पाठवावा. तो हिशोब कम्पट्रोलरकडे दर महिन्यास जो हिशोब पाठविला जातो व जो तो मंजूर करितात त्याच्याशीं प्रत्येक प्रकारें मिळाला पाहिजे. वार्षिक हिशोबांत दाखविलेली प्रत्येक वर्गाची जमा व खर्चाची एकूण मार्च महिन्याचे बसुलाचे व खर्चाचे वर्गवारी गोषवाऱ्याचें कोष्टक " तारीख १ एप्रिल पासून आज तारखे पर्यंत " याशीं मिळाली पाहिजे.

निवडणुकी झाल्या नंतर त्याजबद्दलची संक्षिप्त हकीकत जिल्हा बोरडानें द्यावी व तींत निवडणूक करण्याचा हक्क असलेल्या लोकांची संख्या व ज्या लोकांनीं आपलीं मतें खरोखर दिलीं त्यांची संख्या द्यावी.

जिल्हा बोरडानें हिशोब पसंत केल्यावर त्या वर्षाचे कामा बद्दल दिगदर्शन लिहून त्या सालचे मंजूर झालेले एस्टिमेटाशीं वसूल व खर्चाची तुलना करावी व दिगदर्शनासहीत हिशोब दिपुटी कमिशनरचे मार्फत तारीख १५ मेचे आंत कमिशनरकडे पाठवावा.

कमिशनर यांणीं ते कागदपत्र आपले स्वतःचे टिके सहीत रेसिडेन्सी आर्डर्समध्यें छापले जाण्याकरितां जूनचे १५ तारखेस किंवा त्या सुमारास रेसिडेंट साहेबांकडे पाठवावे.

वार्षिक हिशोबाची एक नकल कम्पट्रोलर यांजकडे ही त्यांचे कचेरींत रहाण्याकरितां ता० १० मे पर्यंत पाठवावी.

९९ एक्सक्ल्युडेड लोकल फंडस ह्मणजे टाऊन व बाजार फंडस यांतून जिल्हा बोरडानें किंवा त्यांचे वतीनें लोकल फंड इंजिनियरिंग खात्यानें सार्वजनिक कामाकडे केलेला सर्व खर्च मामुली कामाचे बिलावर चेक देऊन आदा केला जाईल. तो खर्च इतर खर्चाप्रमाणें क्याश बुक वगैरेंत लिहिला जावा व कम्पट्रोलरचे आफिसांत माहेवारी हिशोब पाठविला जातो त्यांत दाखल केला जावा. परंतु एक निराळा हिशोब त्यास बिलें जोडून सार्वजनिक कामाकडे झालेले खर्चाचा हिशोब देण्याबद्दल सिव्हिल आफिसराचे वहिवाटी करितां नियम प्रांतांत चालूं असतील त्या अन्वयें एग्झामिनर पब्लिक वर्कस आकाउंटस यांजकडे तपासणी करितां पाठवावा.

इनकारपोरेटेड लोकल फंडस ह्मणजे " जुने जागले पट्टीची जमा झालेली शिलक." " शेकडा एक रुपया प्रमाणें सडक पट्टी " किंवा " शाळा पट्टी " यांत खर्ची पडणारे काम तयार करण्याचा पतकर बोरड घेईल तर जरूर लागणारा पैसा जिल्ह्याचे एक्झिक्युटिव्ह इंजिनियर यांजकडून आणविला जावा व खर्चाचा हिशोब वर सांगितलेले नमुन्या प्रमाणें एक्झामिनर पब्लिक वर्कस आकाउंटस यांजकडे परभारें द्यावा.

जिल्हा बोरडचा हिशोब कम्पट्रोलरचे आफिसांत पाठविला जातो त्यांत सामील करूं नये.

### तपासणी.

१०० वसुलाची व खर्चाची देखरेख व हुकमत पुढील शर्तीस व वेळोवेळीं रेसिडेंट साहेब ज्या दुसऱ्या शर्ती फर्मावितील त्यांस अनसरून कमिशनर यांचे हातीं राहील.

पुढील कामा करितां कमिशनर यांची मंजुरी पाहिजे.

१. खजिन्यांत डिस्त्रिक्ट फंडाचे जमेस असलेले शिलके पेक्षां जास्त रकम घेणें.

२. कर्ज काढणें.

३. इतर ठिकाणीं अनामत ठेवण्या करितां किंवा इनव्हेस्टमेंट व्याजीं( ठेवणें करितां) खजिन्यांतून पैसा काढून घेणें.

४. ५० रुपयां पेक्षां जास्त पगाराची नवीन नेमणूक करणें किंवा एखादे कामगाराचा पगार दरमहा रुपये ५० पेक्षां जास्त वाढविणें.

९. डिस्त्रिक्ट फंड वर्क्सवर कामास लावलेले सरकारी कामगारास मेहनताना देणें.

६. मुनिसिपल आणि डिसपेनरी फंडास मदत देणे, अथवा जिल्हा बोरडाचे ताब्यांतील हद्दीचे बाहेरील गोष्टी कडे डिस्त्रिक्ट फंडाचा उपयोग करणें, अगर एखाद्या खासगी कारखान्यास मदत देणें. या जातीच्या हल्लींच्या देणग्या व पुढें देण्याच्या देणग्या, वर सांगितल्या रीतीनें मंजुरी घेऊन जिल्हा बोरड बंद करील तों पर्यंत चालूं ठेवाव्या.

डिस्त्रिक्ट फंड आफिसरांचा पगार व ट्राव्हालिंग अलाउन्स (फिरण्याचा भत्ता) यांस फिनानशिअल व ट्राव्हालिंग अलावन्स कोडचे नियम लागूं पडतील. व पेनशन व इनाम यास सिव्हील पेनशन कोड व रसिडेंट साहेब यांज कडील कमिशनर याचे नांवचें पत्र नंबर ८९३ तारीख ९ एप्रिल सन १८८५ हे लागूं पडतील.

पेनशनचा हक्क असणारे नोकर लोकांस ससपिंड केल्याबद्दल, कमी पगार केल्याबद्दल, किंवा बरतर्फ केल्याबद्दल बोरडाचे हुकुमावर कमिशनर यांजकडेस अपील करण्याचा हक्क आहे.

१०१. कमिशनर हे कंट्रोलिंग आफिसर (देखरेख करणारे अधिकारी) या नात्यानें त्यांजकडे माहेवारी हिशोबा बरोबर पाठविलेल्या सर्व सादील बिलाची तपासणी करतील व बहुधा बजेट एस्टिमेटच्या संबधानें वसुलाची व खर्चाची तपासणी करतील. बोरडाचे मंजुरीनें झालेले खर्चाचे योग्यपणाबद्दल मेळ पहातील व सर्व गैरशिस्त खर्च बंद करण्याबद्दल लवकर तजवीज करतील.

हिशोब तपासल्यावर त्याजवर कमिशनर यांणीं सही करून व त्यास व्हौचरें जोडून कम्पट्रोलरकडे पाठवावे. (पहा नियम ९७)

नियम ९८ अन्वयें कमिशनर यांनीं वार्षिक हिशोब बोरडाचे दिग्दर्शीना सहीत रेसिडेंट साहेब यांजकडे पाठविला पाहिजे. परंतु असें करण्या पूर्वी त्यांणीं जमेची व खर्चाची एकूण माहेवारी हिशोबाचे आकड्याशीं मिळतें हें पाहिलें पाहिजे. त्यांना असें करितां यावें म्हणून त्यांचे आफिसांत एक रजिस्टर ठेविले जावें, त्यांत कम्पट्रोलरकडे हिशोब पाठविण्या पूर्वी माहेवारी आंकडे मुख्य सदरां खालीं मात्र भरले पाहिजेत.

१०१. माहेवारी हिशोब रवाना करण्या पूर्वी कायद्याचें कलम २१ अन्वयें नेमलेले फिन्यान्स सब-कमेटीनें बोरडाचे कचेरींतील खालीं दिलेले बुकांची व हिशोबांची तपासणी करावी. क्याश बुकावर व रजिस्टरांवर त्यांणीं आपली सही करावी, व अशी तपासणी केल्याबद्दल चेअरमन यांनीं दाखला द्यावा.

१. क्याश बुकांतील जमा काऊंटर फाईल पावतीशीं आणि पास बुकांतील फंडांतील जमेशीं मिळवून पहावी.

२. क्याश बुकांतील खर्च व्हौचराशीं, चेकाचे रजिस्टरांशीं व पास बुकांतील फंडांतील खर्चाचे रकमेशीं मिळवून पहावा.

१०३. नोकर मंडळी बद्दल खर्चाची तपासणी कम्पट्रोलर यांणीं त्याच प्रकारचे सरकारी नौकरांस जे नियम लागूं आहेत त्याच नियमां प्रमाणें करावी. परंतु स्थानिक सरकारचे मंजुरीचे ऐवजीं बोरडाची किंवा कमिशनरची मंजुरी त्याचे मंजुरीचे अधिकारांत येणारे बाबतींत मान्य करावी.

नियम १०१ अन्वयें हिशोबावर कमिशनर यांचे तपासणी सही त्यांत दाखल केलेले सर्व खर्च ज्यास "बजेट मंजुरीचा अधिकार" या खालील नियमां अन्वयें आगाऊ मंजुरी लागत नाहीं त्याबद्दल योग्य आधार आहे असें कम्पट्रोलर यांनीं मान्य केलें पाहिजे.

१०४. सिव्हिल आकाऊंट कोडची बाब ४ नियम ३ यांत सांगितलेले पेनशनचा हक्क असणारे नौकरां करितां नौकर मंडळीचे बुकाच्या दोन प्रती प्रत्येक वर्षाचे एप्रिलचे १५ तारखेचे आंत कम्पट्रोलरकडे पाठविल्या पाहिजेत.

१०५. कमिशनरचे व कंम्पट्रोलरचे कचेरीचे नौकर मंडळीचा खर्च सादील व प्रसंगीं होणारे इतर खर्च, जसे नमुने स्टेशनरी वगैरेची खर्च डिस्त्रिक्ट फंडास रेसिडेंट साहेब ठरावितील त्या शेंकड्याच्या प्रमाणानें खर्ची घातला जावा.

प्राव्हिंशीयल (प्रांताचे) फंडाची जमा व डिस्त्रिक्ट फंडाचा खर्च यांची ताळेबंदी दर वर्षी केली जाईल.

१०६. सरसकट प्रत्येक जिल्ह्याचे फंडास पूर्वी प्रमाणें पुढील प्रमाणानें खर्च पडेल. परंतु बोरडाचे फंडास खर्ची पडणारा हिस्सा वर सांगितलेले शेंकड्या प्रमाणें असावा. व ह्या फंडांत खर्च डिपुटी कमिशनरचे हुकुमावरून ट्रेझरी आफिसर यांणीं पास बुक द्वारें करावा.

जागले व लोकल (स्थानिक) पट्टी ........ १/८
टाऊनफंड........................ १/८
बाजारपट्टी........................ १/४
सडकपट्टी........................ १/२
एज्युकेशन फंड........ दर जिल्ह्यास ५ रुपये.

बजेट व मंजुरीचा अधिकार.

१०७. (ए) लोकल फंड बजेटा करितां हल्लीं उपयोगांत असल्या प्रमाणें फिन्यान्स कमेटीनें उत्पन्नाचें व खर्चाचें वार्षिक एस्टिमेट हल्लीं लोकल फंड बजेटा करितां जो नमुना आहे त्या सारख्या छापील नमुन्यांत तयार करावें. तें बोरडाची सभा तारीख १० सपटेंबर इसवीस किंवा त्या सुमारास भरवून तिजकडे पाठवावें.

(बी) कायमचे नौकर मंडळीचे स्केलांत फेरफार व नवीन कारखाने किंवा कामाकरितां तजवीज असे फेरफार किंवा जोडणी योग्य अधिकाऱ्यानें पूर्वी मंजूर केल्या शिवाय बजेटांत दाखल करूं नये. व बेमामुली खर्चाकरितां बजेटांत लिहितांना असें अधिकाऱ्यास नेहमीं लिहिलें पाहिजे.

(सी) जिल्हा बोरडानीं पसंत केलेलें बजेट खुलासा दर्शविणारे यादी सहित दोन प्रती करून डिपुटी कमिशनर यांजकडे ता० १५ सपटेंबर पर्यंत पाठवावें. डिपुटी कमिशनर यांणीं तपासणी नंतर व जरूर असल्यास फेरफार केल्या नंतर अस्सल बजेट खुलासेवार यादी सहीत सपटेंबरचे २५ तारखेस किंवा त्या सुमारास कमिशनर यांजकडे पाठवावें. किंवा दुसरी प्रत सर्व जिल्ह्यांचे लोकल फंड बजेट ज्यांत जिल्हा बोरडाचे आंकडे जरूर दाखल केले पाहिजे त्याच समागमें कम्पट्रोलरकडे रवाना करण्या करितां ठेऊन द्यावी.

(डी) दरम्यान एज्युकेशन, मेडिकल व पब्लिक वर्क्स या संबंधीं उत्पन्न व खर्च दाखविणारा अंदाजा याचा उतारा डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रक्शन, इन्स्पेक्टर जनरल आफ डिस्पेन्सरीज व सेक्रेटरी पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट यांजकडे अनुक्रमें, प्रथम सांगितलेले दोन अधिकारी यांचे माहिती करितां व सेक्रेटरी पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट यांजकडे प्रांतांचे लोकल फंड पब्लिक वर्क्स बजेट तयार करण्याकरितां पाठवावा.

१०८. एस्टिमेट तपासल्यावर व निश्चित झाल्यावर कमिशनर यांणीं आपली तूर्तातुर्त मंजुरी डिपुटी कमिशनरचे मार्फत जिल्हा बोरडास कळवावी. व बजेट बोरडाचे खुलासेवार यादी सहीत व आपले टिके सहीत अस्सल रेसिडेंट साहेब याचे मंजुरीस्तव आक्टोबरचे २० तारखेचे आंत कम्पट्रोलरकडे पाठवावें.

एकंदर प्रांता करितां बजेट तयार करणें तें पूर्वी प्रमाणें कम्पट्रोलर कडून तयार केलें जाईल. व रेसिडेंट साहेब याजकडे ता० १५ फेब्रुवारी रोजीं किंवा त्या सुमारास पाठविलें जावें.

मंजुरीचे अधिकार.

१०९ बजेटांतील योजनेस अनुसरून जिल्हा बोरडाचें काम चालविण्याकरितां प्रसंगोपात लागणारा व जरूरी सादील खर्च पुढें सांगितल्या प्रमाणें करावा.

(ए) प्रत्येक बाबतींत ५० रुपयांपर्यंत बोरडाचे जबाबदारीवर.

(बी) प्रत्येक बाबतींत ५० रुपयांपेक्षां ज्यास्त व १०० रुपयांचे आंत. डिपुटी कमिशनरचे मंजुरीनें.

(सी) प्रत्येक बाबतींत १०० रुपयां पेक्षां जास्त व ५०० रुपयांचे आंत कमिशनरचे मंजुरीनें.

(डी) प्रत्येक बाबतींत ५०० रुपयां पेक्षां जास्त असेल तेव्हां रेसिडेंट साहेबांचे मंजुरीनें.

(इ) विशेष प्रकारचा सादील खर्च रेसिडेंट साहेब यांचे मंजुरी शिवाय करूं नये.

(पुढें चालूं)

NOTIFICATION.

BERAR HORSE AND CATTLE SHOW.

The Resident having sanctioned the proposal to hold a Horse and Cattle show annually in the Province at the same time and place and also the award of rupees 500 as prizes on each occasion and the supply of grass for cattle competing free of charge, it is decided that the show should be held at Amraoti every year in the month of November.

This year the show will commence on 23 rd November 1888 and terminate on 30 th.

Signed. H. C. A. Szczepanski
Commissioner
H. A. D.

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 17, 1888.

THE REPORT ON THE VACCINATION IN THE H. A. D. FOR THE YEAR 1887-88.

We are glad to see that Doctor Little's reports, though they have been considerably reduced in bulk, describe fully the state of his Departments and the work done by them. The present report shows that, on the whole, much good and valuable work, contributing, in a great measure, to protect human life, was done during the past year. Compared with the returns of the previous year there was increase in work everywhere, except in Akola and Buldana Districts. The Sanitary Commissioner himself could have secured satisfactory work in the two districts, one of which is perhaps the most populous and most important of all the others in the Province and therefore ought to have been neglected, by making efficient arrangements for the performance of the duties of the absentees.

The work of the Department was confined mainly to primary operations owing to the people being averse to revaccination. Efforts were, therefore, made during the past year to popularize revaccination, but without appreciable success. It is natural that revaccination should be in disfavor with the people in a province where vaccination was unknown only a few years ago and is still hated by some backward classes of people as a fallacious art of bringing on what is produced by the will of God. It is therefore only prudent that Government should not force it upon the people who have, not yet all, with the greatest difficulty, been, at last, brought to look upon vaccination with favor. In the course of time, as the benefits of vaccination become apparent to them more and more fully, they will, without any trouble on the part of Government to induce them, come to find it necessary to resort to revaccination as the sure means of protecting themselves from the evil effects of small-pox.

In paragraph 3 of his report the Sanitary Commissioner brings to notice the gross misconduct of a vaccinator. The Department should very carefully guard against such misconduct as it will rather impede the progress of vaccination than popularize it, especially among backward classes.

The vaccine operations performed at Dispensary towns were less than those in the previous year. It is really strange that, notwithstanding repeated orders from Government, Civil Surgeons still persist in not taking as much interest in this branch of their duties as the importance of it requires them to take. Indeed some of them utterly neglect it.

A proper vaccination establishment for the Melghat appears necessary. From the work done in that part of the province during the last year it seems that the inhabitants are not so averse to vaccination as to render efforts to extend vaccination to that part unsuccessful.

RESOLUTION.

(Continued from our last issue.)

No cattle should ever be kept in small compounds. Besides the constant danger to health inseparable from this practice, it ensures rapid pollution of the subsoil, augments the difficulty of cleansing, and fouls the well water.

5 Where the cesspit has been close to the house well in the manner shewn in the plans, it would be better to fill the well up with clean earth, and dig another as far as possible from the site of the cesspit. All new wells should be ceased outside with clay or cement, or with concrete, to a sufficient depth to cut off the surface and subsoil water from the well, in the manner shewn in the following section:

The well is dug and built up in the usual way, but when it comes within 8

or 10 feet of the surface, the tube must be coated outside with puddle or concrete, to cut off the upper portion of the water. The tube of the well should be carried two feet above the ground level, and covered with a roof; the ground round the well should also be coated with concrete and sloped away from the well to open channels, as shewn in the plan. With these precautions, which are not difficult to take and not costly, any well within a compound, except in very foul ground, would yield wholesome water.

6 The abolition of well or cesspit privies being absolutely necessary before the water for domestic use can be safe, the only principle that can be adopted in their stead is that of continuous daily cleansing, and removal of all house filth and refuse of food, &c. The floor of the privy should be paved or covered with concrete or asphalte, and a moveable vessel placed upon it to be daily removed and emptied by sweepers, with or without the use of dry earth. There is absolutely no other safe plan except daily removal. If from any local cause daily removal cannot be carried out, then it may be suggested that the municipal authority should construct groups of privies with private keys for the use of families, and that all conveniences of the kind within private compounds should at the same time be abolished. The whole surface of the compound should be kept clean day by day.

7 As much of the fever from which the people suffer is due to sleeping on the ground, no greater improvement could be introduced by the municipality than inducing the people to use beds raised above the ground level.

Where these simple improvements carried out in the smaller municipal towns there would be considerable improvement in the public health, so far as the houses are concerned.

They may be summarized as follows;

(1) Abolishing all cesspits and privy wells, filling them up with clean earth, and substituting for them vessels to be emptied daily, or public privies to be provided as suggested above; all other privy arrangements to be improved in the same way, and everything removed daily.

(2) Removing all wells from the polluted ground near cesspits, and digging new wells as far as possible from them, on the principles already stated. Old wells to be filled up.

(3) Removing cattle from house compounds, improving the surface, and maintaining strict cleanliness

(4) Raising all beds and sleeping places above the ground level.

(5) Where people resort to the fields for natural purposes, provision should be made for immediately covering the deposits with fresh earth, and certain limits should be distinctly marked by posts, within which no inhabitant should be permitted to obey the calls of nature.

(8) Wherever the municipality has been able to provide pure water, brought from a distance, it would be better to close all house wells, or to discourage their use. In this way the house problem would be simplified.

(9) The next most important class of sanitary improvements are those required for the surface of the town outside the houses, and have for their object surface cleanliness, surface drainage, filling up and levelling all hollows and water holes not needed for supplying water for domestic purposes, or for bathing or for watering animals, and removing animals and unwholesome trades beyond the outskirts of the pouplation.

(10) It will be seen that every one of these objects can be attained without outlay of capital. All that is required is labour and a suitable direction of it.

For instance, many municipal towns suffer in health from the presence in or near them of broken ground, holes with water in them, a larger number of tanks than is required for purposes of water-supply, using the same tank for drinking, bathing, washing, and watering animals.

Where such disease causes are present, the following rules should be applied.

1 All holes or inequalities should be filled up and levelled.

2 No tank used for supplying domestic water should ever be used for bathing, or for watering animals. The number of tanks required for all the purposes of the town should be carefully decided, and then all others should be filled up, and the land, which is often of considerable value, should be turned to use.

3 The margins of all tanks should be carefully formed and paved, or covered with grass. Suitable places should be provided for drawing water, not directly from the tank, which should be considered as only the water reservoir, but connected with it, and made of masonry, as shown in the following sketch:

Wells sunk in clean ground at convenient places, and protected as already described, would supply tank water naturally filtered, and probably there would be no objection to draw the water by iron buckets, chain and windlass in a mixed community.

The municipality should take steps for the protection of all tanks and public wells. This is indeed one of their most important duties. There should always be a separate water supply provided for low-caste people.

(To be continued.)

## वऱ्हाडांतील घोड्यांचें व गुरांचें प्रदर्शन.

अलिशान रेसिडेन्ट साहेब बहादूर यांनीं वऱ्हाडांत दरसाल एकाच वेळीं व एकाच ठिकाणीं घोड्यांचें व गुरांचें प्रदर्शन भरविण्याचें व ह्या प्रदर्शनांत प्रत्येक वेळीं ५०० रुपये पर्यंत बक्षिसें देण्याचें, व त्याच प्रमाणें प्रदर्शना करितां आणलेले जनावरांस फुकट चारा देण्याचें, मंजूर केल्यावरून असें प्रदर्शन उमरावती येथें प्रतिवर्षीं नोवेंबर महिन्यांत भरविण्याचें ठरलें आहे.

यंदाचें प्रदर्शनास तारीख २३ माहे नोवेंबर सन १८८८ इसवी रोजीं सुरवात होऊन तें तारीख ३० मिन्हू रोजीं संपेल.

(Signed) H. C. A. Szczepanski
Commissioner
H. A. D.

## वऱ्हाड

हवामान:—दिवसानुदिवस हवा ज्यास्त ऊष्ण होत चालली आहे. पावसाची फारच जरूर आहे. तो नसल्या मुळें लोक अमर्दी हवालदील झाले आहेत. लवकरच पाऊस न आल्यास पिकें वाळून सर्व निराशा होईल. प्रांतांत बहुतेक ठिकाणीं हवा बिघडून हीव ताप वगैरे आजार चांगले जारीनें सुरू आहेत. हवेचा उपद्रव ही बरेंच ठिकाणीं पण तुरळक आहे.

सुमारें दोन महिन्या पूर्वी येथील डे. क. आफिसांतील क्लार्क रा. रा. वामन गणेश लळींगकर यांचे येथें चोरी होऊन सुमारें १०० रुपयांचा माल चोरीस गेला. ही चोरी खरोखर झाली नसून रा. रा. वामनराव यांनीं खोटी बातमी आह्मास दिली असा पोलिसांनीं डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटाकडे रिपोर्ट करून वामनरावावर मुकद्दमा करण्यास परवानगी मागितली. ती माजिस्ट्रेट यांनीं पुरावा नसल्या मुळें दिली नाहींत. असें कळतें. गेल्या दोन तीन महिन्यांत गावांत बऱ्याच चोऱ्या झाल्या त्यांतून पोलिसांना एकीचा ही अद्याप पत्ता लाविला नाहीं. ह्यावरूनच कां आमचे पोलीस आपल्या कामीं दक्ष आहे असें आह्मी समजावयाचें? एवढ्या मोठ्या शहरांत, जेथें डि. सु. पोलीस स्वतः असतात, तेथें पोलिसांचा अशा रीतीचा बंदोबस्त असणें फार लाजिरवाणें आहे. चोरी खोटी व अमक्यावर मुकद्दमा करण्यास परवानगी द्या हें ह्मणण्यास तर पुरावा पाहिजे, करावें तरी काय, ह्मणून आमचे पोलीस मोठ्या विचारांत पडले असेल. चोरीचा तपास लावण्याच्या कामीं श्रम घेणें हें व थांगलें.

रा. रा. हरिहर काशीनाथ पाटील हे० क्लार्क आफ कोर्ट जुडिशीयल कमिशनर आफिस यांस येथील स्मालकाज कोर्टाचे क्लार्क आफ कोर्ट नेमले.

रा. रा. दामोदर नानाजी शिंदे यांस उमरावती स्मालकाज कोर्टाचे क्लार्क आफ कोर्ट नेमले.

गेल्या वर्षाप्रमाणें ह्या वर्षी ही गुरांचे व घोड्यांचें प्रदर्शन व्हावयाचे ठरले. तें येत्या नवेंबरमध्यें उमरावतीस होणार. ता० २३ रोजी आरंभ होऊन ता० ३०. रोजीं संपणार. बक्षिसाकरितां ५०० रुपये सरकार खर्च करणार. प्रत्येक जिल्ह्यांत ह्या प्रदर्शनाकरितां एकएक कमेटी नेमणार. प्रदर्शनाकरितां जीं गुरें येणार त्यांस गवत फुकट मिळणार.

वकिलीची परीक्षा गेले आठवड्यांत संपली. परीक्षेत प्रश्न जसे असावे तसे नव्हते बुकांतील पाठ केलेली पानेंची पानेंच शब्दशः उतरण्याचें काम पुष्कळ होतें. वकिलास माजिस्ट्रेटा पुढें कायदे पाठ ह्मणावे लागत नाहींत. मग अशा अभ्यासाचा व परीक्षेचा उपयोग तो काय?

ह्या परीक्षेंत ११ पैकीं चार उमेदवार पसार झाले ह्मणून समजतें.

हायर व लोअर स्टांडर्ड परीक्षा ता. २२ आक्टोबर पासून सुरू होणार.

येथें जी मुंबई ब्यांकेची एक शाखा ता० १ आक्टोबर पासून येथील सरकारी खजिन्याची व्यवस्था आपणाकडे घेण्यास येणार तीस आपले कचेरी करितां स्टेशना नवळील ड्योरकसमध्यें जागा दिली असें समजतें.

## वर्तमानसार

असें वर्तमान ऐकण्यांत येतें कीं, कर्नल मार्शल निजाम सरकारचे प्रायव्हेट सेक्रेटरी हे आतां इकडे परत येणार नाहींत.

गायकवाडाची प्रकृति स्वित्झरलंडांत गेल्यापासून सुधारली आहे. ते पुढील महिन्यांत हिकडे परत येण्याला निघतील.

पंडिता रमाबाई अमेरिकेंत पुनर्विवाह करणार, असें समजतें.

लाहोर येथें टेक्निकल स्कूल स्थापन करण्याचा पंजाब सरकारचा विचार दिसतो.

गेल्या ५४ वर्षांत इंग्लंडाची संपत्ति तिप्पट झाली, फ्रांसाची चौपट झाली, आणि गेल्या ३८ वर्षांत, अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांची संपत्ति साहापट झाली! पण आमच्या हिंदुस्थानच्या संपत्तिचे काय होतें आहे?

स्वित्झरलंडांतल्या सरोवरांतले पाणी पारीस शहरांत आणून सोडण्याचा विचार चालला आहे तें सरोवर पारिसापासून ३१२ मैल दूर आहे. आणि ह्याप्रमाणें तें पाणी जर पारिसांत आणिलें, तर त्या शहरांतली सर्व वाफेचीं यंत्रें बंद ठेवून त्या पाण्याच्या जोरावर सर्व कारखानें चालवितां येतील असें ह्मणतात.

गोकाक गांवांनवळ एक मोठा धबधबा आहे; त्यांतल्या पाण्याच्या जोरावर एक सुताची गिरणी अलीकडे चालू केली आहे. धबधब्याच्या माथ्यावर एक घर खोदून, त्यांत पाणी घेऊन, तें अडीच फूट रुंदीच्या व दोनशें फूट उंचीच्या एका उभ्या नळांतून धबधब्याच्या पायथ्याशीं नेऊन तेथें त्या पाण्याच्या जोरानें एक पाणचक्की चालू केली आहे; व तिची गति, एका लांबच लांब लोखंडाच्या दोरीनें धबधब्याच्या माथ्यावर बांधलेल्या गिरणीतल्या यंत्रास नेऊन पोंचविली आहे. ह्या कामांत नफा होत आहे. न्या. सु.

बेळगांवाकडे पर्जन्य पडला.

निजाम हैद्राबादेकडे पर्जन्याची अवर्षी पडली आहे.

जर्मन सरकारनें पाण्यांतील फौज वाढविण्याचा हुकूम दिला.

बनारसचे महाराजांनीं न्याशनल कांग्रेसच्या विरुद्ध केलेल्या भाषणांची चोपडी छापून त्याच्या १०००० प्रती इंग्लंडकडे रवाना केल्या. महाराजांचा अंतरंगी हेतु काय असेल. तो असो परंतु हिंदुस्थानांतील लोकांच्या ऐक्यपणा युरोपियन राष्ट्रांत पसरण्यास ही छपी चांगली उपयोगाची आहे. अलीकडे ज्यांस आपलें नांव प्रसिद्धीत आणावेंसें वाटेल तो इंग्रजाची विजार घेऊन हिंदुमधील कुळितें इंग्लिशापुढें ठेवण्याचा यत्न करीत असतो परंतु त्या मूर्खास असें समजत नाहीं कीं, अरशांत दिसणाऱ्या पडछायेच्या तोंडांत बसण्या साठीं मारलेली थपड आपल्याच गालास सुचविणार आहे.

म,

अतिशय लांब तुळवट.– तुर्केच, सानफ्रान्सिस्को संस्थानांतील एका प्रदर्शनामध्यें युनैटेड स्टेट्सच्या वायव्य कोनास असलेल्या प्यूगेट येथाल अशी कारखान्यांतून एक लांब लांकडी तुळवट पाठविण्यांत आलें. त्या तुळवटाचों लांबी १५१ फूट असून जाडी २० चौरस इंच होती. इतक्या लांबीचें तुळवट कधीं कोठें कोणीं पाहिल्याचा किंवा ऐकल्याचा दाखला नाहीं.

योग्य उत्तरः—सातारच्या महाराजांनीं आपल्या पदरचे सरदार दाजीराव शिरके यांचे जवळ एकदां त्यांची फारच उमदा असलेली तरवार मागितली व तिचे बदल दोन चारशें रुपये जी किंमत मागाल ती देतों असें ते ह्मणालें. दाजीराव ह्मणालें, ज्याणें आपली वडिलोपार्जित समशेर मोल घेऊन द्यावी त्याणें मग आपली बायकोही यजमानांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्याकडे खुशाल जाऊं द्यावी, असें मी समजतों! दाजीरावाचें हें बाणेदारीचे भाषण ऐकून तेव्हां पासून त्यांच्या समशेरकडे महाराजांनीं पहाण्याचें सुद्धां सोडलें! ज्ञा. च.

ग्वाल्हेरचे दिवाण व रीजेन्ट सर गणपतराव खडक हे वारल्याचे सर्वविश्रुत झालें आहे. आतां असें कळतें कीं, कै० जयाजीराव महाराजांचे परघरचे चीरंजीव श्री. रा. बळवंतराव भयासाहेब शिंदे यास दिवाणगिरी व रिजन्सि मिळण्याबद्दल सरकारांत विचार चालूं आहे. हें खरें असल्यास ग्वाल्हेर संस्थानातील लोकांचें नष्टचर्य संपून त्यांस अनुकूल काळ आल्याचीं लक्षणें दिसत आहेत असें ह्मणावें लागतें.

मुक्काम पणजी, प्रांत गोवें.

पोर्तुगीज सरकारच्या कायद्यांत कोणत्याही अपराधास देहांत शिक्षा नाहीं. खुनी अपराध्यास किंवा तशा मासल्याच्या अपराध्यांस फार मोठी शिक्षा ह्मटली ह्मणजे काळे पाण्याची शिक्षा! गोवें, दमण, दीव या ठिकाणच्या लोकांस सरकार काळे पाण्या करितां आफ्रिका खंडांतील मोझांबिकास पाठविते. पोर्तुगीज सरकार अपराध्यांस देहांत शिक्षा देणें हें महत्पाप आहे असें समजतें. कारण मनुष्याकडून अपराध हा व्हावयाचाच! असें असून, सजातीयांनीं सजातीयांस देहांत शिक्षा देणें ह्मणजे अघोर कर्म करणें होय.

पणजीस तुरुंग आहे व त्यांत कैदीही आहेत. परंतु कैद्याच्या हातापायांत बेडी नाहीं किंवा त्यांस कामही करावें लागत नाहीं. त्यांस पोटगी त्याच्या घराकडून मिळण्या सारखी नसेल तर मात्र सरकार देतें. कैदी लोकांपैकीं ज्यास जे कसब येत असेल ते जिन्नस तयार करून खुशाल विकावे. आणि आपण आपले इष्टमित्राशी गप्पा टाकीत खुशाल हवा खात बसावें. सारांश घरच्या पेक्षां तुरुंगांत जास्ती सुख असतें. पु. वै.

पृथ्वीचे क्षेत्र व स्थौल्य—कोरड्या जमिनीचे ५५०००००० चौरस मैल, व समुद्र खालच्या जमिनीचे १३,७२००००० चौरस मैल क्षेत्र आहे. त्याचे प्रमाणें कोरड्या जमिनीचें २३४५०००० घन मैल व पाण्याखालच्या जमिनीचें स्थौल्य १२३८००००० घन मैल आहे. जमिनीच्या उंचीची सरासरी २२५० फूट आणि समुद्राच्या खोलीची सरासरी १२४८० फूट आहे.

विकोपास जाणार कीं काय! मझोवा बंदरा बद्दल फ्रांस आणि इटालीची फारच वासावास चालली आहे. हें प्रकरण लढाईवर येऊन बेतल्यास कसें काय करावें असा बिस्मार्क देवास कौल लावण्यासाठीं इटलीचे मुख्य प्रधान तुर्केतच गेले होते. तुकत्याच झालेल्या जर्मनी, आस्त्रिया आणि इटालीच्या तहावरून या त्रिकुटा पैकीं कोणा एकावर दुसऱ्या कोणी हल्ला केला तर तो इतरांवरही केला असें समजून त्यानीं त्याच्या मदतीस जावें असा ठराव आहे. सबब तुह्मांस भिण्याचें कारण नाहीं, असा कौल घेऊन इटलीचे मुख्य प्रधान परत आले. शु. सू.

अमेरिकेंत एका मनुष्यानें एक कार्ड छापण्याचें, कापण्याचें, तिकीट मारण्याचे, व बंडले बांधण्याचें हीं सर्व कामें एका यंत्राच्या योगानें एक मनुष्य दर मिनिटास ३०० कार्डांचे एकेक बंडल बांधू शकतो असें मशीन शोधून काढलें आहे, व प्रत्येक मनुष्य अशीं दोन यंत्रें एकाच वेळीं चालवू शकतो! !

जयपूरच्या महाराजानां के. जी. सी. एस. आय. असा किताब ता. १ सप्टेंबर रोजीं देण्यांत आला. या निमित्त तेथील युरोपियन अंमलदारांना मेजवानीं देण्यांत आली.

पांचशें रुपये पगारावर जे सरकारी नोकर लोक आहेत त्यांचे पगार कमी करण्याचा सरकारचा विचार आहे. असें ह्मणतात.

कानपूर डिस्ट्रिक्ट मध्यें घरें पडून सुमारें ३०० माणसें प्राणास मुकलीं असें ह्मणतात.

बंगालमध्यें गेल्या डिसेंबर मध्यें एक गुप्त पोलिस सरक्युलर निघालें होतें त्याच्या संबधानें नेहमीं चौकशी करण्या करितां कांहीं नवीन युरोपियन पोलिस अंमलदार तेथें नेमण्यांत आले आहेत.

इंग्लंड व कानडा एक होऊन अमेरिकेचे विशेष चालूं देणार नाहीं. असें ड्यूक आफ रटलंड यांनीं ता० ५ रोजीं बोलून दाखविलें.

सीलोन मध्यें आईबाप आपल्या मुलांना विद्या शिकविण्यासाठीं शाळेंत न पाठवतील तर त्यांनां प्रत्येक मुलाबद्दल दर महिन्यास ५ रुपये प्रमाणें दंड द्यावा लागेल असा ठराव झाल्याचें समजतें.

पुणें येथील प्रदर्शना करितां श्री. सांगलीकर यांनीं १२५ रु. दिले; मिरजकर (थोरली पाती) १०० रु. व धाकट्या पाती कडूनही १०० रु. व रामदुर्गच्या संस्थानिका कडून ५० रु. अशा रकमा देण्यांत आल्या.

मि. जस्टिस स्काट मुंबई हाय कोर्टचे जज्ज, मि. क्विंटन, वायव्य प्रांताचे रेव्हन्यू बोर्डाचे सभासद व मि० क्रास्थवेट, मध्य प्रांताचे जु. कमिशनर असें तीन असामी मिळून मि. क्राफर्ड यांच्या खटल्याची चौकशी करतील असें समजतें. सु० प०

हिंदुस्थानांतील आंबे विलायतेस पाठवून एक प्रकारचा नवीन व्यापार सुरू करावा अशी एका डाक्टरनीं सूचना केली आहे.

बंगाल्यांत दुष्काळाचीं कामें सुरू झालीं आहेत.

इसलामपूर येथील एका द्रव्यलोभी दीक्षितांस त्यांनीं वराकडून घेतलेल्या रकमेंत ९० रुपयांची गफलत केली याबद्दल चार महिने सक्तमजुरीची शिक्षा व १२० रुपये दंड झाला. दलाली घेऊन लग्नें जुळविणारांनीं सावध व्हावें.

चार टक्यांच्या स्टाक नोटा सरकारच्या नोटांचा व्हावा तसा फैलाव होत नाहीं. या संबधानें लोकांत भीति असते असे सरकारच्या अनुभवास आल्या वरून सदर नोटा बंद करण्याचा सरकारानें ठराव केला आहे. आतां ज्या लोकांजवळ सदर नोटा आहेत. त्यांच्या त्या बदलण्याच्या पत्कर सरकारनें घेतला आहे. व त्या मालावर कंट्रोलर जनरल यांची नेमणूक झाली आहे. या नोटांच्या बदला १८४२।४३ चे ४ टक्यांचे लोन देण्यांत येणार आहेत, या आदला बदलीबद्दल शेकडा आठ आणे फी घेतली जाईल, परंतु कोणाचे व्याजाचें नुकसान होणार नाहीं.

क० त०

निःसंशय कायदेशीर.

न भूतो न भविष्यति!

फारच दुर्मिळ संधि!!!

बृहद्राष्ट्रीय शाब्दविजिगीषा.

( शब्दांवर बक्षिसें मिळविण्याची चढाओढ. )

मराठींत, इंग्रजींत, गुजराथींत आणि हिंदींत.

बक्षिसांत

रुपये २५००० चा विनियोग !!!

यांत

नशीबाची परीक्षा नसून अकलेचीच परीक्षा आहे.

सिद्धेन्दुचन्द्रिका

नामक अपूर्व ग्रंथ जो मराठींत, गुजराथींत आणि हिंदी भाषेंत प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे, त्याचे वर्गणदारांस मात्र या चढाओढींत प्रवेश करितां येईल.

प्रत्येक प्रतीस किंमत.

दोन रुपये.

वर्गणी भरल्या बरोबर बक्षिस चिठ्ठी मिळेल. तिच्या आधारें ज्या त्या भाषेंत विजिगीषा (जिंकण्याची स्पर्धा) करण्यास सांपडेल.

विशेष योजना.

जे गृहस्थ निरनिराळ्या तिन्ही भाषेंतील तीन पुस्तकांस एकदम वर्गणीदार होतील त्यांसच इंग्रजी भाषेंत शब्द तयार करून विजिगीषा करण्याचा हक्क मिळून शिवाय त्या तिन्ही भाषांत ही विजिगीषा करितां येईल.

या तीन प्रतींची किंमत.

फक्त पांच रुपये.

ठेविली आहे.

सर्व खुलासेवार माहिती साठीं प्रास्पेक्टस मागावा.

मेसर्स जे भाटिया ऍन्ड ब्रदर्स.

नं० ३८८, फाकलंड रोड, भायखळा.

अक्सीरपद्दा.

गजकर्णावर रामबाण औषध.

वऱ्हाड व नागपूर या दोन प्रांतांत हजारों लोकांस गुण येत आहे. गुणा बद्दल खात्री इतकीच कीं, गुण न आल्यास किंमत परत देऊं. गुणाबद्दल पुष्कळ सर्टिफिकिटें आहेत, त्यांपैकीं कांहीं बाटली बरोबर असलेल्या माहितीच्या कागदांत दिलीं आहेत. दर बाटलीची किंमत ०९ आणे.

खरजेवर मलम.

गुलाबी मुळींच झोंबत नाहीं. पांच चार दिवस लावल्यानें खरूज, फोड, आगपैण हीं खात्रीनें बरीं होतात. किंमत दर डबीस ०८ आणे.

हींव तापावर गोळ्या.

कितीही दिवसांनीं येणारें हींव असो सुमारें १० अगर १२ गोळ्यांनीं बंद होतें. दर बाटलीची किंमत १२ आणे.

सूचनाः–ही सर्व औषधें अनुभवलेली आहेत सबब रोग्यांस अशी विनंती आहे कीं गरज पडेल तेव्हां या औषधांचा अवश्य उपयोग करून पहावा. प्रत्येक औषधास बंगी खर्च ०१ आणा. बंगी नाटपेड माहितीचा कागद बरोबर. हीं सर्वे औषधें वऱ्हाडांत अकोलें येथें आमचे दवाखान्यांत रोख पैशानें अगर व्ही. पे. नें मिळतील.

कळावें.नारायण चिंतामण डाक्तर.

☞ हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालिना आगाऊ ... ... १८
केरकोळ अंकास................४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०-१-६
दुसरे खेपेस.... ...०-१

Single copy..........................4 as

Advertisements.
Below 10 lines...2Rs.
Per line over 10..4as.
Repetition perline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

OLXXII AKOLA MONDAY 24 SEPTEMBER 1888 NO 38
वर्ष २२ अकोला सोमवार तारीख २४ माहे सप्टेंबर सन १८८८ इ० अंक ३८

## पत्रव्यवार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

आकोट ता० १८-९-८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृ० सा० नमस्कार वि० वि० आपले कडे खालीं लिहिलेल्या चार ओळी प्रसिद्ध होण्याकरितां पाठविल्या आहेत त्या आपले येत्या अंकांत छापाल अशी उमेद आहे.

पीक पाणी— यंदा वेळेवर पाऊस पडत गेल्यामुळें पिकें उत्तम स्थितींत येऊन आतां ती समूळ नाहींशीं होतात कीं काय अशी लोकांस भिती उत्पन्न झाली होती. कारण गेल्या सर्व महिन्यांत पावसानें अगदीं डोळे वटारले होते. दिवस भर उन्हाळ्याप्रमाणें भासे व रात्रीं तर स्वच्छ चांदणें पडत असे. परंतु लिहिण्यास आनंद वाटतो कीं ऐन वेळेवर पर्जन्यानें बहार करण्याचें मनांत आणून त्यानें काल सायंकाळपासून वृष्टी करण्यास सुरवात केली. तो सर्व रात्रभर अति जोरानें पाऊस पडतच होता व अजूनही पडतच आहे. सर्व शेतकऱ्यास आनंद झाला आहे.

आकोट आकोला रोड— ही सडक सरकारी असून हिची देखरेख करणार, मेटाच्या मजुरापासून तो बडे इंजिनियर साहेबापावेतों एक खंडीभर आहेत, परंतु तिची कांहीं कांहीं ठिकाणीं अशी स्थिती झाली आहे कीं तिला सडक ह्मणण्यासही लाज वाटते. कांहीं ठिकाणीं रेती वगैरे टाकून साफ केली आहे व कांहीं ठिकाणीं जसाचा तसाच चिखल आहे. आतांपासूनच खळगे पडण्यास सुरुवात झाली आहे मग उन्हाळ्यांत काय होणार. नद्यांतून उतरण्याचें संबंधानें तर बोलणेंच नको चंद्रभागा नजीकच्या नदींतून जाणें कांहीं तरी बरें कारण तिला लहानसा पूल आहे व पाणी ही फारसें नसतें परंतु पूर्णा नदींतून जाणें फार भयंकर झालें आहे, हल्लीं उन्हाळ्याप्रमाणें दिवस असूनही वाघोलीच्या बाजूनें ओझ्याची गाडी आणणें ह्मणजे पांचचार माणसें व बैल लावून उचलून आणण्या शिवाय गत्यंतरच नाहीं. बाळापूर प्रमाणें एक लहानसा कमानीचा पूल बांधला असतां पुष्कळ सोय होण्याचा संभव आहे परंतु असें करण्याचें एखादा मोठा साहेब अधिकारी मनांत आणील तेव्हां! या नदीवर यंदा येथील कलालानें एक लहानसें होडगें फायदा होईल ह्मणून ठेविलें आहे व त्या पासून लोकांना ही पुष्कळ सुख झालें परंतु बेल्याचें नशीबच फुटकें कारण होडगें चालण्यापुरतें यंदा नदीला पाणीच नाहीं.

खारा नाला— हा मोठा नाला ह्या सडकेवर आकोटा पासून सुमारें चार मैल असून याला पूल ——————

नएक वर्षे झाले system of education in ... अद्याप तजवीज होत नाहीं हें आश्चर्य आहे येथें सडकेचे बाजूनें मातीचा भराव टाकून उतार करून दिला आहे. परंतु नाल्यास थोडेसें पाणी येऊन चिखल झाला म्हणजे तर गाडी डोक्यावरच घेऊन जावें लागते. असा त्रास होऊं नये म्हणून पडलेल्या पुलाच्या दगडाची फरशी म्हणून बांधली आहे ती पक्की बांधली असती तर ज्यास्त फायदा झाला असता.

लायब्ररी— या गरीब बिचारीची दाद येथून कोठें गेल्या पासून कोणी ही घेत नाहीं असें दिसते. इमारत चांगली आहे परंतु तिची दुरस्ती न केल्या मुळें अतिशय गळते. जागा जागी आतील गिलावा पडलेला आहे खालील तक्त्या अगदी फाटून गेला आहे. एक बाजूस टेबलावर कित्येक वर्षांच्या फायलाचा ढीग पडला असून त्यावर थोपलें भर माती पडलेली आहे. वर्गणीची रक्कम लोकां कडें फार सांचली आहे. साहा सात मराठी पत्रें मात्र टेबलावर पडलेली असतात हिच्याकडें जर येथील अधिकारी व गांवांतील मे. हमूबाबा जमादार गबूसिंग व आसल कारासारख्या संभावित व श्रीमान गृहस्थांनीं लक्ष दिलें तर सहजच बाईची सुधारणा होईल.

मु० कमेटी— पट्टी वसूल करायला कोणी आले म्हणजे ही नवा या गावांला आहे असें दिसतें. कमेटीचा मेंबर अगर अधिकारी कधीं गांवांतून फिरता नां दृष्टीस पडत नाहीं. ठिकच आहे कारण या कमेटींत एक "दरोगा" या हुद्याचा नोकर मुसलमान जातीचा २० रु. पगारावर आहे तोच सर्वांचीं सर्व कामें करितो तो सर्व गांवात हिंडून शहर सफाईची कामें पाहतो. इंजनियर कडचीं कामें तोच करतो नकाशे काढितो, इस्टमेट तयार करतो त्याप्रमाणें कामें तयार करून त्यांचीं मापें ही तो घेतो हिशेब व बिलें करितो व पैसा ही तोच वाटतो, कामें बरोबर झालीं न झालीं हें ही तोच पाहतो. कोठें कमी ज्यास्त असल्यास त्यांचा बंदोबस्त करून रिपोर्ट करितो ह्या ह्या शिवाय बगिच्याचा व्यवस्था तो पाहतो इतके एका मनुष्याकडे असून कामें कशी चोख व बिनबोभाट होतात कोणच्या मेंबराचीं वगैरे बिलकूल तक्रार म्हणून नाहीं. नाहीं तर तुमच्या येथील कमेटींत खंडीभर नोकर व देख रेख करणार व मोठ्या पगाराचे असून कामा बद्दल नेहमी बोंभाट व त्या बद्दल व्हाईस प्रेसिडेंट यास त्रास तुम्हीं जर तेथील कमेटीचे अधिकाऱ्यास येथील कमेटीचा कित्ता घेण्यास शिफारस कराल तर तुमचें फारच हित होणार आहे कांहीं ठिकाणीं रस्ते इतके उंच व गटरें इतकी सखल आहेत की रस्त्यावर रेती वातली म्हणजे तो सर्व गटारांत पडून गटरें सर्व भरून जातात रस्ते उंच सखल असोत किंवा पावसानें वाहून गेलेले असोत त्यावर फक्त दर वर्षी रेती ही टाकायाचीच तिची वाट वर लिहिल्या प्रमाणें ह्या बद्दल आमचे कांही म्हणणें नाहीं, परंतु आम्ही पैसेचेपैसे द्या आणि आम्ही आपले घरा पुढील गटरें स्वच्छ ठेवा व त्यांत रेती व माती पडली तों उपसून काढा काय हा न्याय !! पत्रकर्तेराव रा. रा. देवराव बाबा साहेब गेल्यापासून ह्या बाईची स्थिती व येथील उत्तम बगीच्याची स्थिती चांगली नाहीं बागेंत पहावें तर जिकड तिकडे वास घेण्याला कन्हेंरेच्या फुलांशिवाय कांहीं राहिलें नाहीं.

गणपती व ताबूत—हे हिंदु मुसलमानांचे दोन्ही सण एकेच वेळीं आल्या कारणानें तंटा होईल अशी भिती उत्पन्न झाल्यावरून येथील अधिकाऱ्यांनीं सर्व मुसलमान लोकांस बोलाऊन आणून यंदा दर वर्षाप्रमाणें १३। १४ तारखेस ताबूत थंड न करितां ता० १२ रोजीं सायंकाळचे आंत थंड करावे म्हणजे रात्री गणपती मिरविण्यास हरकत पडणार नाहीं अशी समज देऊन लोकांची समजूतही घातली व लोकांनीही कबूल केलें आहे. परंतु पहावें काय होतें तें. ह्याच वेळेस येथील मुसलमान चीफकान्स्टेबलची बदली अकोल्यास करून अकोल्याचे कोणी कृष्ण या नांवाचे येथें आणले आहेत. ह्या शिवाय दर वर्षाप्रमाणें एकादशीस नाकाजात्री पालखी निघाली होती व ती नियमा प्रमाणें किल्ल्यास प्रदक्षिणा घालून मोठ्या अळाव्यावरून जाणार असें समजतांच बरेंच मुसलमान लोक त्या ठिकाणीं जमले होते परंतु जमादार गबुसिंग यांच्या मध्यस्थीनें व मे. हमूबाबा यांच्या खटपटीनें पालखी दुसऱ्या रस्त्यानें नेण्या बद्दल लोकांची समजूत घालून आलेलें विघ्न पार पाडलें ह्या बद्दल सदरहु गृहस्थांची तारीफ करणें जरूर आहे. ह्याच प्रमाणें ताबूताचे व गणपतीचे दिवशीं हा बंदोबस्त राहील तर तंटा बखेडा न होतां दोन्ही समारंभ आनंदानें होतील ह्यांत संशय नाहीं. पालखी निघाल्यापासून तों परत ठिकाणीं जाई पावेतो मे तहशीलदार साहेब, जमादार गबुसिंग व हमूबाबा स्पे मा. व पोलिसचे बरेंच कान्स्टेबल चीफकान्स्टेबल व पोलिसइन्स्पेक्टर यासह सर्व बरोबर असून कोणी मुसलमानानें बरोबर येऊं नये असा बंदोबस्त केला होता.

पत्रविस्तार फार झाला सबब पुरें करितों, पुढें आणखी एखादे वेळेस भेटेन कळावें लोभ असावा ही विनंती.

"क्ष"

---

( श्रावणी )

स्थळ काळा मारुतीचें पटांगण

दोन भिक्षुक प्रवेश करितात.

पहिला— नमस्कार रामभटजी! कां इतक्या गडबडीनें कोठें चाललात!

रामभटजी— श्यामभट! नमस्कार तुह्माला सर्व कांहीं माहीत असून असें वेड्याचें सोंग काय ह्मणून घेतां.

शाम— मला तर माहातेच आहे पण आपले उगीच विचारलें! राग येऊं देऊं नका. उद्यां किती घरची श्रावणी आपणाकडें आहे?

राम— आहेत पांच ठिकाणच्या एक हायस्कुलांतील एक बड्या कामगाराच्या येथें एथची व तिसरी कांहीं मंडळी मिळून करणार आहेत; चवथी राजेश्वराच्या देवळांतील व पाचवी चाळीतील.

श्या.— मग काय उद्यां तुमच्या शिवाची आहे बोवा चांदल! प्राप्ती कितीशी होईल असें तुह्मास वाटते! होईल कां शेंपन्नास.

रा० छट्टो! कसचे शेंपन्नास घेऊन बसलात. दक्षणेचे दिवस आतां विसरा; आतां पुसतो कोण, घरी कोणाच्या दक्षणा मागावयास गेलें कीं यजमानांनीं लावलेचदार व दुसरीं माणसें लागलीच सांगतात कीं यजमान घरीं नाहींत. जेवावयास बोलावलें असतां आधींच दक्षिणेकडें तोंड करून पाट मांडतात. भोजनानंतर विडा दिला कीं केला नमस्कार अशी तर स्थिती मग कसचे काय ३ ण कसचें काय.

श्या— खरोखर. पुसाल तर आतां लोकाजवळ तर कुठें आहे पैसा. करतात कसें तरी बिचारे. कांहीं पण आमची कांहीं सोय लावाल कां रामभट. तुमच्या हातांखालीं करायला सवरायला नको कां कोणी.

रा— पाहिजे तर खरा परंतु कसें सांगाव बोवा. कदाचित् यजमान रागावले बिगावले तर मग तिथें चारचौघांत फजिती करून घ्यावी ह्यांत कांहीं अर्थ नाहीं. पण कांहीं श्यामभट तुह्मांला गावांत हो दोन चार ठिकाणीं आमंत्रण आलें आहे असें ऐकिलें. तुह्मी चोरून ठेवांनां पण चोरांचीं पावलें चोरासच ठाऊक. चोरून कोणाजवळ प्रत्यक्ष माझ्या जवळ हं. हं. हं.

श्या — ( हसून ) मला जरा आज जरूरीचें काम आहे मी आतां जातो कृपालोभ असूं द्या. नमस्कार.

रा — नमस्कार-- ( श्यामभट निघून जातो ) ( आपल्याशींच ) पहा बेटा आपल्याच्या आपल्या साधून माझ्यांत वाटेकरी व्हावयास पहात होता. पण गाठ कोणाशी आहे. समजलें नाहीं वाटते तु श्यामभट तर हा ही पण रामभट आहे. बरें असो आपल्यासाठीं उद्याला दर्भ, समिधा आणल्या पाहिजेत आपण ही जावें.

( निघून जातो. )

प्रवेश दुसरा.

एक माडीचें घर.

नारायणराव आपल्या पुढें इंग्रजी पुस्तक ठेऊन वाचीत आहेत तोंच श्रीधरपंत प्रवेश करतात

श्रीधरपंत--- कां नारायणराव Higher परीक्षेचा Study तर फार झपाट्यानें चालला आहे बोवा कां कधीं आहे परीक्षा.

ना०— आहे अजून थोडा अवकाश. घोटेशन करूं नये तर काय करावें ही परीक्षा ह्मटली ह्मणजे कोण त्रास पंधरा हजार Subjects शिवाय आह्माला प्रत्येक Head मध्यें pass झालेंच पाहिजे. Examiners लोकांनां कांहीं care आहे कां हवा तसा but they paper काढतात. मग विचार कसला आन् काय कसले. घे प्रश्न कीं लिही अमकें Code पहा तमकें Code पहा. इतकेंही करून paper difficult असला कीं मग इथून तिथून हाकाहाक.

श्री—आपण तर ह्या कटकटींतून सुटलों हें एक ईश्वराचे उपकारच स्मरले पाहिजेत. आंह्मी पण तुमच्या Valuable time ला ह्या श्रावण महिन्यानें तर फारच Hinderances आणले आहेत, श्रावणी सोमवार चार, घरीं मुलींच्या मंगळागौरी. पण खेरेच Tomorrow श्रावणी. कोठें जाण्याचा बेत आहे. I intend to go to ...harpant's. वर्षांची एकदां कट कट यत असते. No help. करूं नये तर old mother शिव्या देते. I must do

ना—काय करितां. आलिया भोगासि असावें सादर॥ देवावरी भार घालूनिया॥ but I must study hard I will bring my book to study there. निदान दोन तास तरी जाणारच. हेच दोन तास जर मी study केला तर माझी पांच सहा Pages तरी होतील. आपण करावी खटपट. success देणें God कडे आहे.

आपल्या studies ला फार अडथळा आला. तर मी आतां जातों.

( नारायणराव पुन्हा घोकित बसतो )

प्रवेश ३

( एक मनुष्य कण्हत पडला आहे जवळ त्याची बायको बसली आहे. असा पडदा उघडतो )

गृहस्थ—प्रिये. काय सांगू. ( कण्हतो). मी असा मागच्या जन्मीं कोणता अपराध केला होता ह्मणून मला देवानें ह्या दशेला आणलें. देवा ( डोळ्यांत पाणी आणून ) मला मरणाची भीति वाटत नाहीं. परंतु माझ्या मागें माझ्या प्रियेचें कसें होईल. मी उगीच आपल्या भावाशीं भांडलों. जर भांडलों नसतों तर त्यांनीं जनलज्जेस्तव तरी तिला पोसलें असतें. माझ्या आईची ममता माझ्या लहान भावावर असल्या मुळें ती त्याच्या येथें गेली. आतां दुसरा कांहीं इलाज दिसत नाहीं. आपल्या आईला बोलवावें व तिच्या पायांवर डोकें ठेऊन क्षमा मागावी कशी झाली तरी आपल्या लेकराची दया येईलच. ( मोठ्यानें कण्हतो )

स्त्री—हें काय असें, करावें. ताप जाईल एक दोन दिवसांत. ( आपल्याशीं ) डाक्टराचें अवषधे सुरूं आहे परंतु तापांत अजून फरक कसा पडत नाहीं. उघड-हें पहा ताप आज जरी कमी लागतो जाईल हळू हळू. दुखणें येतांना हत्तीच्या पायानें येतें व जातांना मुंगीच्या पायानें जातें. यथांशीं तुह्मी बराच वेळ बोललेत त्या मुळें पहा बरें किती घाम आला आहे. मी सासूबाईनां पाठवूं कां कोणी बोलावयाला. रामा! अरे रामा कोठें गेला मेला कोण जाणें. ( मोठ्यानें ) राम्या! अरे भाऊजींच्या येथें जाऊन सासूबाईना सांग कीं इकडे बोलावलें आहे ह्मणून.

रामा— जी. सांगतों

स्त्री— काय सांगशील?

रामा— कीं बाईनीं बोलावलें आहे ह्मणून शेनी.

स्त्री— हा मेल्या. यांचें नांव सांग, बे ह्मण कीं बोलावलें आहे.

रामा— बरं अहे ( ह्मणून निघून जातों. )

गृहस्थ—( पुन्हा कण्हत) देवा मी तुझी पूजा अर्चा कांहीं केली नाही. लोकांत तूं नाहींस असें बोललों परंतु हे इश्वर माझ्या मनांत खरोखर तसें कांहीं नव्हते. नवीन तऱ्हे प्रमाणें मी कांहीं तरी बोललों तर हे इश्वरा मला या दुखण्यांतून बरा होऊं दे ह्मणजे खरोखर मी आपल्या धर्मप्रमाणें वागेन. मी सर्वथैव अपराधी आहे तर हे ईश्वरा तूं मला क्षमा कर. मी खरोखर आतां वांचत नाहीं. ईश्वरानें तरी मला काय ह्मणून वांचवावें. मी फार अपराधी आहे ( डोळ्यांत पाणी आणतो.

स्त्री— हें असं काय बरं करावं. तुह्मीच असा धीर सोडल्यात तर मी कोणाकडे पहावें बरं. जय तुळशी माते मला चुडेदान दे मी एका सवाष्णीची ओटी खणा नारळानें भरीन

इतक्यांत गृहस्थाची आई प्रवेश करितें.

गृहस्थ— ( डोळ्यांत पाणी आणून ) आई आईग! मी खरोखर फारच फार अपराधी आई. तूं माझा भार नऊ महिने वाहिलास मला लाहानाचे मोठें केलेस. माझें लहानपणी हट्ट पुरविलेस. बाबा मारावयास लागेल ह्मणजे तूं त्यांची विनवणी करून मला सोडविलेस मी एकदां भिंतीवरून पडत होतों त्या वेळेला तूं धावत येऊन हात पसरून मला झेलून धरलेस. माझें गू मूत काढलेस, मी रडावयास लागलों ह्मणजे मला कडेवर घेऊन तूं उगे केलेस, मी आजारी पडलों होतों त्या वेळीं माझ्या पासून तुला फार उपद्रव झाला व तो तू सर्व निमूटपणें सहन केलास.

गृहस्थ—- तूं रागावली नाहींस हें पाहून माझें अर्धे दुखणें बरें झालें आतां खरोखर मी बरा होईन मी कांहीं बोललों नाहीं पण उगीच आपलें मनाला जर तसें चमत्कारिक वाटावयास लागलें ह्मणून तुला बोलावणें पाठविलें.

आई— मवापेक्षां पहा आतां तुझ्या अंगांत ताप पुष्कळ कमी आहे. आतां तूं थोडेसे पथ्याचे घेऊन नीज ह्मणजे बरें वाटेल. राधा! अगराधा! पथ्याचें आण. गृहस्थ पथ्याचे घेऊन पडतो. )

आई— आतां सध्यां जवळ कोणास येऊं देऊं नको. मी आतां जात थोडा थोडा डोळा लागला ह्मणजे बरें वाटेल.

( असें ह्मणून निघून जाते )

रामभट— आपल्याशीच यजमानांनीं

( या पुढें चौथ्या पानावरील दुसरे कालमवर वाचावे. )

---

मु० पुसद ता० २०-९-८८

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस

साष्टांग नमस्कार वि. वि. बरेच दिवस झाले भेट झाली नाहीं पत्रद्वारें भेट घ्यावी या हेतूने खालीं चार शब्द लिहिले आहेतः—

माझ्या अनुभवावरून मला असें वाटतें. कीं कोणताही मनुष्य कोणत्या प्रकारचा आहे हें एकदम कळून येत नाहीं. त्या मुळें कित्येक वेळां मनुष्याचें भाषण, चेहरा, व सुविचार याचे योगानें आपल्या मनावर त्याचे वर्तन चांगलें आहे अशा विषयीं एक प्रकारचा ठसा उमटतो. परंतु जसजशी त्या मनुष्याशीं आपली सलगी आणि सहवास हीं वाढतात तसतसा तो ठसा कमी होतो किंवा सदृढ होतो. म्हणजे भाषण आणि सुविचार या प्रमाणें त्यांचें वर्तन दिसून आल्यास त्याचें विषयीं आपल्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते, इतकेंच नाहीं तर पूर्वीं झालेल्या मनाच्या कलास आपला सहवास पुष्टी करण होतो व उलट वर्तन दिसून आल्यास अर्थात वाईट ग्रह होतो. आतां कोणी कल्पना काढील की ज्याचे विचार ( सु ) चांगले त्याचे वर्तन चांगले नसणें हें केवळ निरोधा भासोत्पादक आहे. परंतु थोडा ज्यास्त विचार केल्यास त्याच्या कल्पनेला जागाच राहणार नाहीं पहा, आता प्रचारांतील ढळढळीत उदाहरण घेऊं. आपण, पुष्कळ वेळा शास्त्री लोकांना! शिकलेल्या लोकांना व पाद्री लोकांना समाजांत भाषण करितांनां पाहिले आहे. सर्वांच्या भाषणांत सुविचार सुनीति ओतप्रोत असते; परंतु समाज विसर्जन झाला आणि गृहकर्म व इतर गोष्टीचा त्यांना वेध लागला म्हणजे शास्त्री बोवांची आणि पाद्री साहेबांची अमोल्य शास्त्रांत, आणि बायबलांत व तशीच शिकलेल्या लोकांची वाचलेल्या पुस्तकांतच राहतात. सर्वच असें असतात असें माझे म्हणणें नाहीं तथापि बोलण्या प्रमाणें वागणारे लोकांचें शेकडा प्रमाण फारच थोडें असत. या वेळेस तुकारामाचें पद्य "बोलें तैसा चाले त्याची वंदावें पाऊलें" हें येथें लिहिल्या शिवाय माझ्यानें रहावत नाहीं. खरोखर ह्या पद्यांत सांगितल्या प्रमाणें चालणारीं जीं कांहीं रत्नें आहेत त्यांच्या विषयीं पूज्यबुद्धि होणें साहजीक आहे व पूज्यबुद्धि झाली म्हणजे तिच्या मागें त्यांचें वंदन हें आहेच. बोलण्या प्रमाणें वर्तन न करणारे पुष्कळ असल्या मुळें अशाशीं आपला संबंध फार पडतो. पोकळ सुनिति आणि सुविचार यांनीं पूर्ण भरलेलें आहे असें भाषण करणाऱ्या मनुष्यांच्या वर्तनाविषयीं चांगला पोक्त विचार केल्याशिवाय मनामध्यें कांहीं एक मत ठरवूं नये, कारण एकदम वाईट किंवा चांगलें मत ठरविल्यास पुढें असें घडून येतें कीं फारच फार चांगला किंवा फारच फार वाईट असा त्यांच्या विषयीं ग्रह होतो. वाईट ग्रह झाल्यास पूर्वीं ठरविलेल्या मना बद्दल आपले मनाला वाईट वाटेंत या साठीं नवीन परिचित मनुष्यांचें वर्तना विषयीं मन ( चांगले किंवा वाईट ) एकदम न होऊ देण्या विषयीं आपण काळजी घेतली पाहिजे. कळावें.

आपला

"मित्र"

---

पिंपळगांव राजा ता. २९—९—८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० आपली भेट घेणें महत्वाचें वाटल्यावरून भेटीस आलों आहे. भेट द्याल अशी उमेद आहे. एडिटर साहेब ए... हिन्या पासून मेघराज रुष्ट होऊन गेलें होतें, त्यांनीं कालचे सोमवारीं येऊन अमृतवृष्टि करून सर्व प्राणिमात्रांस तृप्त केलें. त्याज बद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. गांवांत रोगराई वगैरे कांहीं नाहीं.

लिहिण्यास विशेष आनंद वाटतो कीं सरकारानें आमचे गांवांत दवाखाना दिला आहे. व त्यांवर वेळोवेळीं जे डाक्टर येतात. ते लोक कल्याणाकडे लक्ष्य देणार व आपल्या कर्तव्यांत पूर्ण निष्णांत असतात. सुमारें दोन महिनें झाले येथील दवाखान्यावर महादेव गोपाळ डाक्टर यांची नेमणूक झाली आहे. हे फी न घेतां गरीब गरीब रोग्यांच्या घरोघर फिरून लोकांस औषधें देतात. व त्यास त्या कामीं बहुतांशीं यश येत आहे. आज येथील साळ्याची बाई प्रसुती वेदनांनीं तीन दिवसापासून फार अजारी होती तेथें सुईणीचा बिलकुल उपाय चालेनासा झाल्यावर अखेर आज दोन प्रहरीं बारा वाजतां डाक्टर साहेब यांस त्या बाईची त्या दुःखापासून मुक्तता करण्यास पाचारण आले. त्या प्रमाणें त्यांनीं लागलीच जाऊन शस्त्रक्रियेचा योग्य उपयोग करून त्या बाईची सुटका करून दिली. मुलाचा हात एक दिवसा पासून बाहेर आला होता. मूल आंत मेलेले असून पालथे पडलेले होते. या वेळीं अशा सुज्ञ मनुष्याशी गाठ न पडती तर त्या बाईचा काय परिणाम झाला असतां हें सांगणें नकोच. मशारनिल्हे डाक्टर साहेब आमच्या सुदैवानें येथें बहुत दिवस राहोत असें आम्ही मनापासून इच्छितो. कळावें.

आपला एक,

ग्रामस्थ.

---

## वऱ्हाडांतील घोड्यांचें व गुरांचें प्रदर्शन.

अलिशान रेसिडेन्ट साहेब बहादूर यांनीं वऱ्हाडांत दरसाल एकाच वेळीं व एकाच ठिकाणीं घोड्यांचें व गुरांचें प्रदर्शन भरविण्याचें व ह्या प्रदर्शनांत प्रत्येक वेळीं ९०० रुपये पर्यंत बक्षिसें देण्याचें, व त्याच प्रमाणें प्रदर्शना करितां आणलेले जनावरांस फुकट चारा देण्याचें, मंजूर केल्यावरून असें प्रदर्शन उमरावती येथें प्रतिवर्षीं नोवेंबर महिन्यांत भरविण्याचें ठरलें आहे.

यंदाचें प्रदर्शनास तारीख २१ माहे नोवेंबर सन १८८८ इसवी रोजीं सुरवात होऊन तें तारीख ३० मिनहू रोजीं संपेल.

(Signed) H. C. A. Szczepanski
Commissioner
H. A. D.

---

वऱ्हाडसमाचार.

...e authc
...ed their best
Mob but in vain. At last
Commissioner Captain Morris
...ne on the scene of the riot and
...is utmost to induce the Moho-
...t to no purpose. Captain Morris

...द्य ४ शके १८१०.

ते

रक

## बरार रुरल बोरडस लॉ सन१८८५ यांतील कलम ३३ अन्वयें नियम.

२१०. कमाकरितां व रिपेरी करितां योजना बजेट एँस्टिमेटांत पुढील मंजुरीनें केली जावी.:—

(ए) प्रत्येक कामांत ५०० रुपयां पेक्षां जास्त खर्च न लागण्याचा अंदाजा असेल तेव्हां जिल्हा बोरडाचे!

(बी[ प्रत्येक कामांत ५०० रुपया पेक्षां जास्त व १००० रुदयाचे आंत खर्च लागण्याचा अंदाज असेल तेव्हां डिपुटी कमिशनर यांचे.

(सी) प्रत्येक कामांत १००० रुपयां पेक्षां जास्त व५००० चे आंत खर्च लागण्याचा अंदाजा असेल तेव्हां कमिशनर यांचे.

(डी) प्रत्येक कामांत ५००० रुपयां पेक्षां जास्त खर्च लागण्याचा अंदाजा असेल तेव्हां रेसिडेंट साहेब यांचे.

( ई ) ५०० रुपयां पेक्षां जास्त खर्च लागणारे प्रत्येक नवीन कामाबद्दल तें बांधण्याचें सुरू करण्याच्या पूर्वी प्लयान (नकाशा) एस्टिमेट तयार केलें पाहिजे व तें त्या कामांतील वागबगारानें पसंत केलें पाहिजे. कामांतलि वागबगाराची पसंती प्रत्येक कामास ५०० रुपयां पेक्षां जास्त खर्च लागण्याचा अंदाजा नसेल तर लोकल फंड इंजिनियराची पाहिजे. प्रत्येकी १०००रुपयापेक्षां जास्त खर्च लागण्याचा अंदाज नसेल तर जिल्ह्याचे एग्झिक्युटिव्ह इंजिनियर यांचा पाहिजे. व पत्येकीं १००० पेक्षां जास्त खर्च लागणारा असेल तर सुपरेंटेंडिंग इंजिनियर यांचा पाहिजे.

( एफ ] कामें व रिपेरी कोणाचे हातीं करविण्याचीं याचा निकाल डिपुटी कमिशनर याणीं करावा.

### NOTIFICATION.
### BERAR HORSE AND CATTLE SHOW.

The Resident having s nctioned the proposal to hold a Horse and Cattle show annually in the Province at the same time and place and also the award of rupees 500 as prizes on each occasion and the supply of grass for cattle competing free of charge, it is decided that the show should be held at Amraoti every year in the month of November.

This year the show will commence on 23 rd November 1888 and terminate on 30 th.

Signed. H. C. A. Szczepanski
Commissioner
H. A. D.

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 24, 1888.

### THE PRESENT SYSTEM OF EDUCATION.

The present system of education in Berar does not differ materially from the system now in vogue in the other provinces; and is a copy of the system existing now in England. The school course consits, as every body knows of eleven standards up to the Matriculation. A boy going to school at the age of five can pass the Matriculation Examination at 16 if he successively goes through the standards each year without a stop. The course of study required for this Examination represents the necessary equipment of a man prepared for the ordinary business of life. He gets in fact a smattering knowledge of many things which are likely to be of use to him and his faculties are generally educated and shaped to a certain standard. But the results after all of the present system of education are not as satisfactory as they should be. The aim of educating a human being, according to spencer, is to bring out the individual faculties as to serve the practical needs of every day life. The degrees of importance to be attached to the several branches of learning must in his opinion vary according to their exact utility in the economy of human life. For instance, it is of the most paramount importance to a human being to *live*. The question of existence is being one of firstrate importance, a human being should be taught these subjects that treat of a man's physical well-being; and so further on in due course. It will probably take a long time before the governments of civilized countries will be induced to adopt spencer's principles of education and it would be too much to expect so radical a reform in the whole educational system of this province, as would practically upset the present system altogether. However as it is, there are many faults in the present system which could be considered with a view to do away with them.

The very first objection that we take to the present system is the variety of subjects required for each standard. The subjects prescribed for a particular standard must be familiar to the Student and before he can commence the next standard, he must obtain a certain percentage in each subject. Whatever the mental aptitude of a boy, he must go through the various subjects. He must mug up bits of geography, learn by rote his dates in history and do up several other things in the same fashion. A boy who defective in Mathematics may perhaps have to leave school or get into the higher class after a lapse of years. It may be so, but practically it comes to this; almost every boy has capacity encugh to mug up the subjects for his standards and he passes on to the higher. And then what is attained by such a method? Is the boy a whit better simply because he can repeat parrot like a few things learnt at school. Mental energies are unnecessarily wasted in an endeavour to get through the course laid down. What we would recommend is that the master of a class should note the subject or subjects for which a boy has no apitude and omit that subject at all so far as that boy is concerned. A boy should be allowed to get into the higher Standard even if he is not up to the mark in that particular subject or subjects for which his master may have noted his incapacity. A set of rules could be framed so that masters might not abuse their powers; or at the annual examination such boys might be excluded from the boys presented for the annual examination under each standard. Of course, if he wants to go up for the Matriculation or any other qualifying Examination, he must, by the time he appears for it, be prepared for all the subjects needed. What we want is only a latitude for every boy to get up his subjects according to his fitness for learning them. For instance, generally speaking we would reserve, history, geography, and involved Arithmetical rules to a later age. The chief merit of giving instruction in a variety of subjects is not so much the intrinsic value of the subjects themselves as the general education and development of the intellectual faculties; and therefore no subject be unnecessarily hurried through or be taught at an age when the recipient is not ripe for it. Besides a waste of energies which this process involves, the mental strain required at that tender age most decidedly tells upon the health of the pupils. The variety of subjects hardly leaves scope for physical exercise or play; and this at a time when the physical man is to be developed. Of course the Educational Department has supplied in many places and is ready to supply in others gymnastic apparatus; but that really goes for nothing if a boy has to study at school and at home. The most patent evil, which is one result of the strain at a tender age, of the present system is to sap the young boys.

---

The occurrence of Hindu and Mohamedan festivals together has always been a source of disturbance. But now, when everywhere people are conceiving high notions, and when the great movement of National Congress, having for one of its chief objects the union of the several classes of people in India hitherto quite inimical to one another, is actively on foot, it is disappointing to find that disturbances, which can be avoided by friendly relations without any hindrance to religious ceremonies, still occur in large cities where respectable Mohamedan gentlemen live and can guide their community with ease. Our province, we are sorry, was not entirely free from disturbances on the occasion of the last *Moharum* and *Ganesh Chaturthi* festivals. Ellichpur and Sundurjan, a village in the Murtizapur Taluk, are the places the Hindu and Mohamedan Communities of which have shown themselves to be wayward and uncompromising. We hope the Government will make the offenders pay dearly for their folly and prejudices.

Ellichpur 18th, September 1888,
Mohoram Riots.

Sir,

Please publish the following lines in a corner of your valuable journal.

Ellichpur is an ancient city of Mohamedans who have occupied the greatest part of the city. We have been hearing of the Mohorum Riots taking place in several parts of India, but this year our ancient city is itself the scene of Mohorum Riots. On sunday 16th, September 1888, a serious riot occurred between Hindus and Mohomedans of Ellichpur on a public road. The Deputy Commissioner Captain Morris had already made nice arrangements to prevent the unhappy occurrence. A Balaji's Procession was passing the road with great pomp attended with tomtoms of Native music. When the procession arrived on a public road, about 500 Mohomedans assembled and obstructed the procession on the road. They did not allow the procession to go further. High words poured and the Mohomedans severely beat the man in charge of the native drum (Nagarkhana): Police authorities attending the procession tried their best to pacify the Mohomedan Mob but in vain. At last the Deputy Commissioner Captain Morris himself came on the scene of the riot and also tried his utmost to induce the Mohomedans but to no purpose. Captain Morris thinking the critical state of affairs at once ordered Military authorities to be present on the spot to restore order. Within 10 minutes, Military authorities with one gang of soldiers arrived on the spot. As soon as soldiers appeared on the scene the Mohomedans tried to run and took refuge in the houses of their friends. The Military authorities dispersed the Mob with great skill and succeeded in arresting some 36 devotees of Mohomed. The efforts of Captain Morris and the Military authorities are praiseworthy. The state of affairs was so critical that had Military authorities not arrived on the scene for a few minutes more, the riot would have ended in dangerous consequence. All is quiet now at Ellichpur.

The *Tabut* procession of Ellichpur Cantonment passed off successfully without occurrence of any unhappy incident. As it was raining (though not heavily) the Spectators were not much entertained by the scene of Tabuts which were passing off very hastily. The Police Bandobast has praisewothy in the Cantonment.

We are very glad inform that we have an incessant shower of rain since yesterday evening and it is expected that it will last for 2 or 3 days. The kunbis have become cheerful.

Yours truly
"X"

---

Bassim 22-9 88

The late heavy fall of rain came all on a sudden not a minute too soon, as if ordered by the Almighty to whose care the universe is entrusted. This timely fall did immense good in point of standing crops and saved the people from the danger of famine. One or two heavy showers more will be enough to get the rabi crops. Now the public health is good so far as any epidemic is concerned.

Mr. Mahajani Educational Inspector H. A. D. just arrived here by today's Mail Tonga and commenced his examination. Really his extra-ordinary energy deserves great praise. Any other man in his position would not have been so active and assiduous. Result of the school and his other movements will be next communicated to you in time.

Yours truly
"X"

## वऱ्हाड

उमरावती स्मालकाज कोर्टाच्या क्लार्कचे जागीं रा० दामोदर नानाजी शिंदेकर यांस आक्टिंग नेमुन येथील स्मा० का० कोर्टाचे क्लार्कचे जागीं रा० हरीहर काशीनाथ यांस नेमलें; व ज्युडिशल कमिशनरच्या हे. क्लार्कचे जागीं रा०काशीनाथ यादव यांस नमलें.

केटा येथें एक पांचशें रुपये दरमहाची ट्रेझरी आफिसरची जागा खाली आहे; त्यावर वऱ्हाडांतील कोणी युरोपियन ट्रेझरी आफिसर जाण्यास खुष आहे का म्हणून विचारणा झाली आहे.

रा. बळवंत बापूजी यांस मंगरूळपीर येथें तहशीलदार नेमलें व त्या जागीं जाण्या करितां ते इकडून गेले.

रा. विश्वनाथ नारायण दांडेकर ए. अ. कमिशनर यांस मोर्शीस बदलणार म्हणतात.

उमरावतीचे माजी सिव्हिल सर्जन हयूम यांची कामटी येथें [illegible] जागीं नेमणूक झाली. त[illegible] कामावर रुजूं होण्या करितां तिकडे गेले.

## वर्तमानसार

कोणत्याही म्युनिसीपल कमेटीनें केरोसिन तेलावर जकात बसवूं नये असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे.

जर्मन सरकार आपले आरमार वाढाबिणार असें त्यांनीं जाहीर केलें.

झांजिबार प्रांतांतील तांडे शहरांतील लोकांनीं जर्मन लोकांवर हल्ला करून त्यांचें नुकसान केल्यामुळें जर्मन लोकांनीं तें शहर जमीनदोस्त करून सोडलें.

मणीपूरचे दिवाण बलदेवसिंग यांनीं त्यांच्या घरीं कांहीं लोकांना ठार मारलें. चवकशी चालू आहे.

काश्मीरचे माजी दिवाण लक्ष्मणदास यांनीं धुळिपसिंग यांस एक पत्र पाठविलें आहे त्यांत रशियानें हिंदुस्थानावर स्वारी केल्यास मनुष्याची व पैशाची मदत तुह्मास करूं असें लिहिलें आहे असें ह्मणतात.

क्यापटन रामसी यांना काश्मीरचे रेसिडेंट नेमणार असें ठरल्याचें समजतें.

कलकत्ता हाय कोर्टांत तिसरा नेटिव जज्ज नेमण्याचा विचार चालला आहे असें समजतें.

ब्रह्मदेशांतील जवाहिरांचा खाणीचा मक्ता मेसर्स राथचाइल्ड व स्ट्रीटर यांनीं घेतल्याचें कळतें.

गेल्या सोमवारी सिमल्यास मोठी आग लागून तेथील क्लब बिल्डिंग जळून खाक झालें. नुकसान सुमारें १०,००० रुपये झाल्याचें समजतें.

इस्कखान काबुलावर जाण्याच्या बेतांत आहे असें मेशद येथील हिंदुस्थान सरकारच्या तेहरानच्या बातमीदाराच्या ता. १० च्या तारेवरून कळतें.

लंडन ब्यांकेमधून रशियाकरितां ६० लक्ष रुपये काढल्याचे समजतें.

काबूलास मिशन पाठविण्याचा सरकारचा विचार होता परंतु तो डळमळींत झाला आहे असें ह्मणतात. कारण समजत नाहीं.

चीन देशांत बुधाचा नवा पितळेचा पुतळा तयार होत आहे. त्याची उंची ४९ फूट असून कानांत एकेक मनुष्य बसता येईल अशी कानाची रुंदी आहे हा पुतळा तिबेट येथें नजर पाठविण्यांत येईल.

कानपूरच्या आसपास १० मैलांवर रूस येथें एक बाई सती गेल्याचें कळतें. याबद्दल चवकशी झाली परंतु कांहीं कळलें नाहीं.

सु० प०

टेहळणी— क्या डुरिंग व डो. राबर्टसन हे चितळ येथें जाण्याकरितां निघालेले गृहस्थ गिल्गितच्या पश्चिमेस २९ कोसांवर गोकच येथें जाउन पोचले.

दुष्काळाचें भय— निझामच्या हद्दींत पाऊस चांगला पडत नसल्यामुळें तळीं व विहिरी यांचें पाणी फार कमी झालें आहे व त्यामुळें दुष्काळ न पडला तरी महागाई होण्याची निझाम सरकारास फार काळजी लागली आहे.

सर्व रजपुतान्यांतील ओसाड प्रदेशांची सर्वे करण्यांत येणार आहे.

पकडला— ब्रह्मदेशांतील एक बडा दंगेखोर नामत यास इंग्रजी फौजेनें पकडलें. गेल्या जानेवारीपासून सुमारें २४,००० बंदुका पकडण्यांत आल्या असें सांगतात.

बेबनाव— चीनसरकार व इंग्रजसरकार यांच्यांत बेबनांव होण्याचीं चिन्हें दिसूं लागली आहेत असें कित्येक ह्मणूं लागले आहेत.

निमंत्रणाचें आपल्याकडसच दिलें आहे त्या प्रमाणें बहुतेक निमंत्रणें तर केलीच आतां फक्त सितारामपंताकडे जावयाचे ह्मणजे झालें ते गृहस्थ येतात कीं नाहीं कोण जाणें नुकतेंच दुखण्यांतून उठले आहेत. मग आपण जावें कीं नाहीं कोण जाणें. पण खरेंच आतांशां ते स्नान सुद्धां करीत असतात जावें आपण व बोलावून पहावें आले तर आले. ( पुढें चालून ) हेंच सितारामपंताचें घर. काय करतात बरें बघू. वा. वेळ तर छान साधली बोवा. नुकतेंच जेऊन उठून पोटावरून हात फिरवून हलके हलके शतपावली करीत आहेत. ( पुढें होऊन)

रामभट—नमस्कार, दादासाहेब.

सितारामपंत —या बसा असें

राम०—( आपल्याशींच ) यांनीं बसा तर ह्मटलें. आपण खुर्चीवर जाऊन बसावें तर भिक्षुकांना हें चांगलें दिसत नाहीं. खालीं खुर्चीच्या जवळ जमिनीवर बसावें हें चांगलें

( असें ह्मणून जाऊन बसतो )

सितारामपंत— कां रामभट उद्यां श्रावणीचा बेत कोणीकडे.

रामभट — यजमानांनीं मला निमंत्रणासाठींच आपणाकडे पाठविलें आहे. तर आपण कृपा करून उद्यांक सकाळीं सात वाजायच्या सुमारास नरहरपंताकडे यायचें.

सि.— ठीक आहे. ( असें ह्मणून विडा देतात व आपणही लागलींच विडा खाऊन तोंडांत कृष्णपत्री टाकतात. )

रामभट— येतो आतां नमस्कार.

सि०— ( तोंडानें ) नमस्कार व हातानीं धूम्र वाहक बंब दिव्यावर धरतात. व बंबांतील धूर तोंडांतून काढतात.

प्रवेश ६ एक मोठा दिवाण खाना

( होमाचीं दोन स्थंडिलें मांडलेलीं आहेत व जवळच रामभडजी दर्भ वगैरे ठेऊन बाकीची तयारी करीत आहेत व बाकीची मंडळी आपआपलीं आसनें घालून बसत आहेत इतक्यांत पडदा उडतो )

रामभडजी— कांहो अजून सितारामपंत, नारायणराव, श्रीधरपंत वगैरे मंडळी यावयाची आहेत. साडेसात तर वाजून गेले. मला आणखी दोन ठिकाणीं जावयाचें आहे. सकाळ पासून एक ठिकाणची श्रावणी स्वतः करून आलों. एका श्रावणीला मुलाला पाठविलें होतें. मग कसें काय आपल्या विचारास येतें. आपण सर्वजण जर यजमानाना सांगाल तर आमचें ठीक जमेल नाहीं पेक्षां मुलाच्या गळ्यांत आणखी एखादी भरली पाहिजे.

सर्वमंडळी— बरें आहे. नरहरपंत, अहा नरहरपंत आता कां उशीर; भडजीनां सांगू कां प्रारंभ करावयास नारायणराव, श्रीधरपंत, सितारामपंत पहिली सुधारलेली मंडळी ती श्रावणीला येतेंच ह्मणून नेम काय.

नरहरपंत— बरें आहे करा प्रारंभ. मंडळी आली ह्मणजे त्यांना बसवूं पलिकडच्या हालांत ह्मणजे त्यांनां होमाच्या धुरापासून त्रास व्हावयाचा नाहीं व कोणत्याही तऱ्हेनें पंचाईत होणार नाहीं.

पंचगव्य वगैरे झाल्यानंतर पहिल्या होमास सुरूवात होते.)

इतक्यांत श्रीधरपंत, नारायणराव व सितारामपंत. प्रवेश करितात.

नरहरपंत याहो नारायणराव, या श्रीधरपंत याहो सितारामपंत

श्री. ना. सि.— आलों हो नरहरपंत. कां श्रावणीला beginning झाला कां.

नरहरपंत— कांहो जरा दोन तास पर्यंत तुह्मी इंग्रजी न बोलले तर चालणार नाहीं काय? बरें असो आपल्याला धुरापासून त्रास होऊं नये ह्मणून आपल्या साठीं आंतल्या दिवाणखान्यांत व्यवस्था केली आहे.

नरहरपत— रामभडजी! यांना पंचगव्य पाजून शुद्ध करा.

रामभडजी— ठीक आहे.

श्रीधरपंत तीन आचमनें घेतों व तोंड वेडेवाकडें करून ह्मणतों रामभडजी ह्यांत दूध साखर फार थोडी टाकिलीत.

सितारामपंत— तें फारच घाणेरडे असतें तें नको.

रामभडजी— नारायणराव तुह्मालाहो

नारायणराव nont want ह्याच्या पेक्षां म्युनिसिपालिटीच्या गाड्यांतील पाणी जास्ता पवित्र असतें तें प्यावयास काय हरकत आहे.

रामभडजी— वाः नारायणराव, सुधारलेल्यांचें अगदीं अग्रगण्य आहात हो- आपल्याला जर तें पाणी शुद्ध वाटत असेल तर आपण घटकाभर बाहेर बसा भंग्याकडून आपल्या नरड्यांत गाडींतील पाणी ओतवितों ( रागावून ) अशी जर तुह्मीं मतें होतीं तर शेण खावयास आलास कशाला येथें.

सि. श्री.— भडजी? जा आपल्या कामास लागा. रागावूं नका.

( इकडे रामभडजी होमास सुरूवात करतात )

सि.— नारायणराव! अहो येथें आहेत सगळे भ्रमिष्ट why do you trouble your bead to no purpose. They are fools. सुधारणा, सुधारणा ह्मणजे काय हें ह्यांनां काय समजणार आहे. ह्या foolish लोकां बरोबर तुमचें bead muddled कसें झालें कोणाला माहीत.

ना.— पण मी कांहीं त्यांनां बोललों कां माझ्या मनाला जें कांहीं वाटलें तें बोललें हा एक जुलमच आहे कीं, आम्हाला न वाटतें तें बोलायची चोरी असावी.

श्री.— वेडा आहेस तूं. अखेर आपणाला सध्या त्याच्या मताप्रमाणेंच होकार दिला पाहिजे. कारण आपण म्हणतों त्या प्रमाणें time यायला बराच अवकाश आहे. let it go. तें पलीकडें काय पडलें आहे हो.

सि.— चंची. very well घ्या जरा तोंड स्वच्छ करा.

श्री.— आणा इकडें आपण सर्वजण खाऊं घ्या नारायणराव पान.

ना.— ठीक आहे. but where is my book I must have it with me' कसें strong bound आहे पाहिलेतनां leather binding असेंच strong असावयाचें.

सर्वजण मिळून विडे व तंबाखू खातात इकडे रामभडजींनीं सर्व आटोपून दुसऱ्या होमाच्या व ऋषीच्या पूजेच्या तयारींत आहेत तोंच एक गडी एक पत्र टाकून जातो.

श्रीधरपंत-नरहरपंत तो Berar Samachar तर घ्या इकडे कांहीं नवल विशेष असल्यास पाहूं.

नरहरपंत— एका ( मुलास ) गोप्या जा बाळ त्यांनां तेवढें पत्र नेऊन दे.

( तो पोर नेऊन देतो. )

नरायणराव— ह्या जाहिराती नोटिसा not wanted वर्तमानसार useless. Local. हवामान we already know. मराठी आर्टिकल foolish Marathi language No use. सर्व ठिकाणीं इंग्रजी भाषाच पसरली पाहिजे. जर माझी English language mother tounge असती तर मला हें laws पाठच करावयास लागले नसते. English artical काय आहे. What have we to do with it Done आटपलें.

इतक्यांत रामभटजी जानवी घ्यावयास सांगतात

श्रीधरपंत– well नारायणराव. श्रावणी आली संपत. ह्या रामभटानें कांहीं सोडलें कीं काय. इतक्या लवकर कशी झाली. बरें take your जानवीं.

( रामभटजींनी मंत्र वगैरे सांगितल्यावर सर्वजण जानवीं घालतात. )

श्री– काहो नारायणराव what दक्षणा are you giving. I wish to give only half an anna

ना — I have brought nothing

सि– I have got one anna I will to lend you $\frac{1}{2}$ Anna

( दक्षणा वगैरे दिल्यानंतर सर्वजण आपआपल्या घरी जातात. )

श्रावणीला आलेला एक गृहस्थ— काय हा श्रावणीचा थाट. ही मंडळी आली होती कशाला कोणाला माहीत. एक दोन तास धर्मसंबधी कामांत बसण्याची वेळ आली ह्मणजे लागलीच मस्तक ठणाणतें. हाका मारतात त्या सुधारणा काय करावें, इंग्रजाचें राज्य आहे. आज जर मराठ्याचें राज्य असतें तर दोन खोड्यांत देऊन बसविलें असतें. ह्या माझ्या बोलण्यावरून कदाचित लोकांचा असा समज होईल कीं मऱ्हाठ्यांचें राज्य जुलमाचें होतें. परंतु इंग्रजाचें राज्यप्रत्यक्ष इंग्लंडांतील तें तर न्यायी असावेनां. न्यायी जर असतें तर act of uniformity वगैरे acts कशाला ठरले असते. आपल्या धर्मांत यांना कंटाळा येण्या जोगें काय आहे बरें. धर्म तर कितो शुद्ध, उपयोगी, व चांगला आहे बरें दररोज थंडोवरून स्नान करोंवें अंगांचा मळ घासून काढावा. नंतर ईश्वराधना करावी. सर्वांनीं एक जागीं बसून डोळे मिटले ह्मणजे ईश्वर पावेल व प्रत्येकानें आपआपल्या घरीं भक्तीनें प्रार्थना केली तर ईश्वर पावत नाहीं काय? संध्याकाळीं हातपाय धुतल्याशिवाय जेवावयास बसू नये. किती सोज्वळ रीती आहेत बरें परंतु आमच्या लोकांना ह्या रीती आवडावयाच्या नाहींत. जर आपण त्यांना चार उपदेशांचे शब्द सांगितले तर उगीच आपल्या मैत्रींत वाकडे येणार. तर पुढच्या वऱ्हाडसमाचारांत नाटक रूपानें वृतांत लिहावा ह्मणजे ह्यांच्या मुर्खपणाची वाचकांना कांहीं कल्पनायेईल. तर आतां आपण त्याच खटपटीला लागावें.

( निघून जातो )

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रासिद्ध केलें.